cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com | नवी दिशा... नवे विचार..... | email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–१७७ | शनिवार, दि.२५ ऑक्टोबर २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### ‘एआय’ च्या बनावटगिरीवर नियंत्रण पाहिजेच

उशिरा का असेना परंतु केंद्र सरकारला जाग आली आहे. गंगा-यमुना नदीच्या पुलाखालून बरेच पाणी वाहून गेले आणि आता केंद्र सरकारने ‘आर्टिफिशियल इंटेलिजन्स’ म्हणजे ‘कृत्रिम बुद्धिमत्ते’चा जो गैरवापर केला जात आहे त्या अनुषंगाने काहीतरी कठोर पावले उचलण्याची तयारी सुरू केली आहे.

## थोडक्यात...

### १ नोव्हेंबरपासून बँकांच्या नियमांत बदल

दिल्लीः वित्त मंत्रालयाने बँकिंग क्षेत्रात महत्त्वपूर्ण सुधारणा जाहीर केली आहे. १ नोव्हेंबर २०२५ पासून ग्राहकांना त्यांच्या बँक खात्यांमध्ये चार व्यक्तींना नामनिर्देशित करण्याची परवानगी दिली. मंत्रालयाने म्हटले आहे की, ‘‘संपूर्ण बँकिंग प्रणालीमध्ये दाव्यांच्या निपटारामध्ये एकसमानता, पारदर्शकता आणि कार्यक्षमता’’ सुनिश्चित करणे हे या निर्णयाचे उद्दिष्ट आहे. हा बदल बँकिंग कायदे (सुधारणा) कायदा, २०२५ चा भाग म्हणून आला आहे, जो १५ एप्रिल २०२५ रोजी अधिसूचित करण्यात आला होता आणि त्यात रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया कायदा, १९३४ आणि बँकिंग नियमन कायदा, १९४९ यासह प्रमुख आर्थिक कायद्यांमध्ये १९ सुधारणा समाविष्ट आहेत. नवीन तरतुदींनुसार, ठेवीदारांना एकाच वेळी आणि सलग नामांकनांमधून निवड करण्याची लवचिकता असेल.

### देशातील ११२ औषधे गुणवत्ता तपासणीत अपयशी

नवी दिल्ली : देशातील औषधांच्या गुणवत्तेबाबत सरकारने धक्कादायक माहिती उघड केली असून सप्टेंबर २०२५ मध्ये झालेल्या तपासणीत ११२ औषधांचे नमुने गुणवत्ता चाचणीत अपयशी ठरले. याचा अर्थ असा की, ही औषधे रुग्णांना बरे करण्याऐवजी नुकसान पोहोचवू शकतात. या ११२ नमुन्यांपैकी ५२ नमुने केंद्रीय औषध प्रयोगशाळेने तपासले होते, तर ६० नमुने राज्य प्रयोगशाळांनी मानक दर्जाचे (एनएसक्यू) नसल्याचे आढळून आले. छत्तीसगडमधील एका औषधाचा नमुनाही बनावट असल्याचे आढळून आले. एका अधिकाऱ्याने सांगितले की, औषधांच्या गुणवत्तेची तपासणी दरमहा केली जाते. सप्टेंबरमध्ये अनेक शहरांमधून औषधांचे नमुने गोळा करण्यात आले. चाचण्यांमध्ये असे दिसून आले की, ११२ औषधे एक किंवा अधिक गुणवत्ता मापदंडांमध्ये अपयशी ठरली, जसे की सक्रिय घटकाची योग्य मात्रा गहाळ होणे किंवा इतर काही कमतरता असणे.

### पंढरपूरसाठी रेल्वेकडून विशेष गाड्या

मुंबई : येत्या काही दिवसांत पंढरपूर येथे कार्तिकी मेळा सुरु होणार आहे. यासाठी विविध राज्ये आणि जिल्ह्यांमधून लाखो भाविक येतात. या पार्श्वभूमीवर जय्यत तयारी सुरु झाली असून, यानिमित्त भाविकांच्या सेवेसाठी मध्य रेल्वेनेही पुढाकार घेतला आहे. मध्य रेल्वेने प्रसिद्धीपत्रक जारी केले असून यामध्ये विशेष गाड्यांची घोषणा केली आहे. पंढरपूर येथे भरणाऱ्या कार्तिकी मेळा २०२५ साठी भाविकांचा प्रवास सुलभ करण्यासाठी ३० ऑक्टोबर ते ४ नोव्हेंबर २०२५ पर्यंत मिरज-लातूर आणि सोलापूर-मिरज दरम्यान या सेवा चालवल्या जातील, असे अधिकृत निवेदनात म्हटले आहे. या काळात एकूण ३६ विशेष रेल्वे फेऱ्या चालवल्या जातील, असे सोलापूर विभागाच्या जनसंपर्क विभागाने प्रसिद्ध केलेल्या प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे.

# सोयाबीनची खरेदी हमीभावाने होणार

## मुख्यमंत्री फडणवीसांची मोठी घोषणा; ३० तारखेपासून नोंदणी सुरु

पुणे । प्रतिनिधी

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी (दि.२४) माध्यमांशी बोलताना सोयाबीन खरेदीविषयी माहिती दिली. मुख्यमंत्री म्हणाले की, सरकार राज्यात कापूस आणि सोयाबीनची खरेदी सुरु करणार आहे. त्यासाठी शेतकऱ्यांची नोंदणी केली जाणार आहे. हमीभावाने सोयाबीन विक्रीसाठी शेतकऱ्यांना ३० ऑक्टोबरपासून नोंदणी करता येणार आहे. नोंदणी झाल्यानंतर हमीभावाने खरेदी सुरु होईल. त्यामुळे कोणत्याही शेतकऱ्याने कमी भावात व्यापाऱ्यांना सोयाबीन विकू नये, असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले आहे.**



शेतकऱ्यांनी घाबरण्याचे कारण नाही. सर्व शेतकऱ्यांची नोंदणी केली जाणार आहे. तसेच जे शेतकरी हमीभावाने आले सोयाबीन विकू इच्छितात त्या सर्वांचे सोयाबीन खरेदी केले जाणार आहे. कोणताही शेतकरी वंचित राहणार नाही. राज्य सरकार, पणन विभाग, नाफेड आणि केंद्र सरकारने राज्यात खरेदीचे जाळे निर्माण केले आहे. सरकार शेतकऱ्याच्या सर्व सोयाबीनची खरेदी करेल. व्यापारी हमीभावाने खरेदी करणार असेल तरच शेतकऱ्यांनी व्यापाऱ्यांना माल द्यावा. अन्यथा सरकारी खरेदी केंद्रांवर हमीभावाने सोयाबीनची विक्री करावी,’’ असे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी केले आहे. राज्यात सध्या सोयाबीनचा बाजारभाव कमी आहे. सरकारने यंदा सोयाबीनला प्रतिक्विंटल सरासरी ५ हजार ३२८ रुपये हमीभाव जाहीर केला आहे. मात्र बाजारात सध्या सोयाबीन ३५०० ते ४ हजारांच्या दरम्यान विकले जात आहे. हमीभावापेक्षा किमान १५०० रुपयाने कमी दरात सोयाबीन विकले जात आहे. त्यामुळे शेतकरी ▶▶ पान २ वर

# मुलीच्या मृत्यूस जबाबदार असलेल्या दोषींना फाशी द्या!

## पीडित महिला डॉक्टरच्या कुटुंबीयांची मागणी



डॉ.संपदा मुंडे



गोपाल बदने

बीड । प्रतिनिधी

सातारा जिल्ह्यातील फलटण उपजिल्हा रूग्णालयात महिला डॉक्टरच्या आत्महत्या प्रकरणाने राज्यभर खळबळ उडाली आहे. तिच्यावर एका पोलीस उपनिरीक्षकाने सातत्याने बलात्कार केल्याचे समोर आले. तसेच पोस्टमॉर्टम रिपोर्ट बदलण्यासाठी तिच्यावर वरिष्ठांचा दबाव टाकण्यात येत होता असे सुसाईड नोटमधून समोर आले आहे. पीडित महिला डॉक्टर ही मूळची बीडच्या वडवणी तालुक्यातील होती. तिच्या मृत्यूची बातमी समजताच गावात शोकाकुल परिस्थिती निर्माण झाली आहे. आपल्या मुलीच्या मृत्यूसाठी जो कुणी दोषी असेल त्याला फाशीची शिक्षा द्या, अशी मागणी पीडितेच्या कुटुंबीयांनी केली आहे.

सातारा जिल्ह्यातील फलटण उपजिल्हा रूग्णालयात महिला डॉक्टरने आत्महत्या केली. मृत डॉक्टरच्या हातावर सुसाईड नोट आढळली आहे. या सुसाईड नोटमध्ये महिला डॉक्टरने ▶▶ पान २ वर

### सुसाईड नोटमधील धक्कादायक मजकूर

सातारा जिल्ह्यातील फलटण उपजिल्हा रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी म्हणून कार्यरत असलेल्या २८ वर्षीय डॉ.संपदा मुंडे यांनी गुरुवारी (२३ ऑक्टोबर) रात्री फलटणमधील एका हॉटेलच्या खोलीत जीवन संपवलं. डॉ. मुंडे यांच्या हातावर लिहिलेल्या नोटमध्ये स्पष्टपणे म्हटले आहे की, पोलिस निरीक्षक गोपाल बदने हा माझ्या मृत्यूचे कारण आहे. त्याने माझ्यावर चार वेळा बलात्कार केला. पाच महिन्यांपासून त्याने माझा बलात्कार, मानसिक आणि शारीरिक छळ केला. कुटुंबीयांच्या मते, डॉ. मुंडे यांच्यावर पोस्टमॉर्टम अहवाल बदलण्याचा आणि चुकीचे फिटनेस प्रमाणपत्रे देण्याचा दबाव होता, ज्यामुळे त्या प्रचंड मानसिक तणावाखाली होत्या.

### धनंजय मुंडे यांच्याकडून एसआयटी चौकशीची मागणी

मुंबईः साताऱ्यातील महिला डॉक्टरच्या आत्महत्येनंतर आता आरोग्य आणि पोलीस व्यवस्थेविरोधात अनेक प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहेत. वरिष्ठांच्या दबावामुळे आणि पोलीस अधिकाऱ्याने केलेल्या बलात्कारामुळे फलटणमधील उपजिल्हा रुग्णालयातील डॉक्टरने आत्महत्या केली. या प्रकरणी तिने पोलीस उप-अधीक्षकांकडेही तक्रार नोंदवल्याची माहिती समोर आली आहे. त्यावरूनच आता राज्याचे माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी एसआयटी चौकशीची मागणी केली आहे. सदरची महिला डॉक्टर ही बीडची असल्याने आणि मुंडे असल्याने जर वरिष्ठांनी तिच्या तक्रारीची दखल घेतली नसेल तर ते गंभीर आहे. या प्रकरणी स्वतंत्र एसआयटी नेमण्यात यावी. तसेच हे प्रकरण फास्ट ट्रॅक कोर्टात चालवावे अशी मागणी धनंजय मुंडे यांनी केली आहे.

# चालू हंगामासाठी एफआरपी जाहीर करा

## ऊस परिषदेतून राजू शेट्टी यांचा सरकारला इशारा



तुळजापूर । प्रतिनिधी

तालुक्यातील शहापूर येथे स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने शुक्रवारी (दि.२४) सकाळी शेतकऱ्यांच्या मागण्या संबंधी व वेगवेगळ्या प्रश्नांवरती चर्चा करण्यासाठी ऊस परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. परिषदेच्या प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज चौकातील महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून शेतकरी संघटनेचे नेते तथा माजी खासदार राजू शेट्टी यांच्या हस्ते सुरुवात करण्यात आली. यावेळी हालग्यांच्या कडकडातात शेतकरी संघटनेचा विजय असो, शेतकरी एकजुटीचा विजय असो अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला होता.

यावेळी आयोजक शहाजी सोमवंशी, स्वाभिमानी शेतकरी संघटना सोलापूर जिल्हाध्यक्ष विजय ▶▶ पान २ वर

## वडिलांचा मालमत्ता करार मुलगा १८ वर्षांचा झाल्यावर रद्द करू शकतो–सर्वोच्च न्यायालय

नवी दिल्ली । वृतसंस्था

अल्पवयीन मुलांचे वडील किंवा कायदेशीर पालक यांनी केलेला मालमत्ता विक्री किंवा हस्तांतरण करार मुलगा किंवा मुलगी १८ वर्षांचे झाल्यानंतर खटला न भरता रद्द करू शकतात, असा महत्त्वपूर्ण निर्णय के.एस. शिवप्पा विरुद्ध श्रीमती के. नीलम्मा या खटल्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. कर्नाटकातील शमनूर गावात १९७१ मध्ये रुद्रप्पा यांनी त्यांच्या तीन अल्पवयीन मुलांच्या नावावर दोन भूखंड खरेदी केले होते. रुद्रप्पा यांनी न्यायालयाच्या ▶▶ पान २ वर

# सीटीईटी परीक्षेची तारीख जाहीर!

## शिक्षक बनण्याचे स्वप्न पाहणाऱ्यांसाठी मोठी संधी

नवी दिल्ली । वृतसंस्था

**केंद्रीय माध्यमिक शिक्षण बोर्ड (सीबीएसई) ने केंद्रीय शिक्षक पात्रता परीक्षा (सीटीईटी) च्या तारखेची घोषणा केली आहे. देशभरातील शिक्षक बनण्याचे स्वप्न पाहणाऱ्या उमेदवारांसाठी ही अत्यंत महत्त्वाची परीक्षा ८ फेब्रुवारी २०२६ रोजी आयोजित केली जाईल. ही परीक्षा देशभरातील १३२ शहरांमध्ये एकूण २० भाषांमध्ये घेतली जाणार आहे.**

ही परीक्षा प्राथमिक आणि उच्च प्राथमिक स्तरावर शिक्षक म्हणून नियुक्तीसाठी उमेदवारांची पात्रता तपासण्यासाठी घेतली जाते. या परीक्षेचा मुख्य उद्देश हा आहे की, देशातील शाळांमध्ये अध्यापनाचा दर्जा सुधारला ▶▶ पान २ वर




# आदित्य ठाकरेही फोडणार बोगस मतदानाचा बॉम्ब

मुंबई । प्रतिनिधी

**मुंबईत सोमवारी होणाऱ्या ठाकरेंच्या शिवसेनेच्या निर्धार मेळाव्यात युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे एक मोठा राजकीय बॉम्ब फोडणार आहेत. या बाबत मिळालेल्या माहितीप्रमाणे, आदित्य ठाकरे या मेळाव्यात मुंबईतील मतदार याद्यांमधील प्रचंड घोटाळ्याचा पर्दाफाश करणार आहेत.**

दिल्लीमध्ये काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी जसा बोगस मतदारांचा विषय पुराव्यांसह मांडला होता, तसाच प्रकार आदित्य ठाकरे मुंबईत सादर करणार आहेत. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने मागील काही महिन्यांत मुंबईतील मतदार याद्यांची स्वतंत्र



तपासणी केली असून, त्यात असंख्य विसंगती, डुप्लिकेट आणि बनावट मतदार नोंदी आढळल्याचे सांगितले जात आहे. या पार्श्वभूमीवर मुंबईत होणाऱ्या महापालिका निवडणुकीआधी हा विषय राजकीयदृष्ट्या मोठा वाद निर्माण करू शकतो. वरळी डोम येथे सोमवारी सायंकाळी पाच वाजता हा निर्धार मेळावा आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्यात पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, शिवसेनेचे सर्व मुंबईतील पदाधिकारी, विभागप्रमुख, ▶▶ पान २ वर

# बदामराव पंडित जाणार भाजप मध्ये

## गेवराईतील राजकीय समिकरणे बदलणार

गेवराई । प्रतिनिधी

शिवसेना उध्दव बाळासाहे ठाकरे पक्षाचे नेते माजी मंत्री बदामराव पंडित यांनी भाजपमध्ये प्रवेश करण्याचा निर्णय घेतला आहे. दिपावली स्नेहमिलन कार्यक्रमातून बदामराव पंडितांनी थेट प्रवेशाचे संकेत देत लवकरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या



उपस्थितीत प्रवेश करणार असल्याचे स्पष्ट केले आहे. बाळराजे पवार भाजपातच आहेत, त्यामुळे येत्या काळात मी आणि बाळराजे सोबत काम करू असेही माजी मंत्री बदामआबा पंडित यांनी सांगितले. जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणूकीत एकत्र काम ▶▶ पान २ वर

## देशात पहिल्यांदाच एका दिवसात तीन अवयव प्रत्यारोपण

कोट्टायम । वृतसंस्था

केरळमधील कोट्टायम सरकारी वैद्यकीय महाविद्यालयात २३ ऑक्टोबर रोजी तिहेरी अवयव प्रत्यारोपण करण्यात आले. हृदय, फुप्फुस आणि मूत्रपिंड-एकाच दिवशी तिहेरी अवयव प्रत्यारोपण करणारे हे भारतातील पहिले सरकारी रुग्णालय बनले.

सरकारी रुग्णालयात फुप्फुस ▶▶ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,
बीड, दि.२४ ऑक्टोबर २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १०४.०० क्विंटल | २,३९१ | २,८९० | २,६४७ |
| ज्वारी/हायब्रिड: १९६.०० क्विंटल | २,००० | ३,०६० | २,५४२ |
| मका/लोकल: १०.०० क्विंटल | २,०४० | २,१०० | २,०७० |
| तूर : १२.०० क्विंटल | ६,५५१ | ६,५५१ | ६,५५१ |
| उडीद : ११.०० क्विंटल | ३,००० | ५,१५१ | ४,०७५ |
| बाजरी: २०७.०० क्विंटल | २,३०० | ४,६०१ | २,७८० |
| मुग: १.५० क्विंटल | ४,५०० | ४,५०० | ४,५०० |
| सोयाबीन: ८३६.५० क्विंटल | ३,३०० | ४,२०० | ३,९६९ |
| हरभरा: २.५० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |

# भुजबळांचा जामीन रद्द करुन मंत्रिमंडळातून बाहेर काढा–जरांगे पाटील

जालना । प्रतिनिधी

**मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे यांनी पुन्हा एकदा मराठा आरक्षणाच्या मुद्यावरून राज्य सरकारवर तीव्र हल्लाबोल केला आहे. त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना थेट उद्देशून म्हटले की, हैदराबाद गॅझेटनुसार तातडीने प्रमाणपत्र वाटप सुरू करा. तुम्ही मराठ्यांची मने जिंकली आहेत, ती कायम ठेवायची असतील तर वेळ घालवू नका.**



यावेळी जरांगे पाटलांनी छगन भुजबळ यांच्यावरही निशाणा साधला. मुख्यमंत्र्यांना उद्देशून ते म्हणाले, सरकारमधील लोकं हैदराबाद गॅझेट विरोधात कोर्टात जात आहेत, हे कसे चालतंय? छगन भुजबळांनी गॅझेटविरोधात पाच याचिका दाखल केल्या, हे तुमच्या परवानगीशिवाय शक्य आहे का? देवेंद्र फडणवीस यांच्यावर विश्वास असल्याचे सांगत जरांगे म्हणाले, फडणवीस ▶▶ पान २ वर

cmyk

अग्रलेख

# 'एआय' च्या बनावटगिरीवर नियंत्रण पाहिजेच

उशिरा का असेना परंतु केंद्र सरकारला जाग आली आहे. गंगा-यमुना नदीच्या पुलाखालून बरेच पाणी वाहून गेले आणि आता केंद्र सरकारने 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स' म्हणजे 'कृत्रिम बुद्धिमत्ते'चा जो गैरवापर केला जात आहे त्या अनुषंगाने काहीतरी कठोर पावले उचलण्याची तयारी सुरू केली आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता तयार झाल्यानंतर माहिती युगामध्ये बरीच मोठी क्रांती झालेली आहे. प्रत्येक क्षेत्रात या तंत्राचा वापर करून अनेक कामे अल्पावधीत केली जात आहेत. त्याचबरोबर जिथे मनुष्यबळ कमी पडते त्या ठिकाणी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर यशस्वी होत असल्याचे आढळून येते. परंतु जेवढी यंत्रणा चांगली तेवढीच ती धोकादायकदेखील ठरत आहे.

कोणत्याही यंत्रणेचा दुरूपयोग हा अत्यंत हानिकारक असतो. आपण वातानुकूलित यंत्रणेचा वापर मोठ्या प्रमाणात करीत आहोत, त्याचे दुष्परिणाम हवामानामध्ये आपल्याला आढळून येतात. पृथ्वीवरील ओझोनचे प्रमाण कमी होत असल्याने तापमानामध्ये वाढ दिसून येतेच, शिवाय भौगोलिकदृष्ट्या ज्या अनपेक्षित घटना आपण पाहतो त्यांचे प्रमाणही वाढत आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता हा प्रकार माणसासाठी वरदान की शाप याविषयी बराच उहापोह झालेला आहे. 'एआय' घातक म्हणणाऱ्यांची संख्यादेखील मोठ्या प्रमाणात आहे, मात्र ही अत्याधुनिक यंत्रणा स्वीकारण्यासाठी अनेक हात पुढे आलेले आहेत. त्यातून एक गोष्ट आपल्या लक्षात येते ती म्हणजे अनेक कंपन्यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून आपल्याकडील अनेक कर्मचाऱ्यांना घरी पाठविले आणि हे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. दहा किंवा पन्नास कर्मचारी जे काम करतात, ते काम कृत्रिम बुद्धिमत्तेद्वारे अवघ्या काही तासांमध्ये होऊ शकते.

कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर जेवढा होतो त्याहीपेक्षा जास्त प्रमाणात गैरवापर सध्या केवळ भारतातच नव्हे, इतरही राष्ट्रांमध्ये होऊ लागला आहे. एका राष्ट्राने कृत्रिम बुद्धिमत्तेवर बंदी घालावी यासंदर्भातील ठरावही संसदेत संमत केला. प्रत्यक्षात त्या राष्ट्राने त्याची अंमलबजावणी केली की नाही, हा विषय गौण आहे. जग पुढे धावत आहे आणि आपल्यालाही मागे राहता येणार नाही, पुढे जावेच लागेल. कृत्रिम बुद्धिमत्ता हा प्रकार किंवा ही यंत्रणा हे आपल्यासाठी फार मोठे वरदान आहे, परंतु अलीकडे समाजमाध्यमांतून ज्या प्रकारे त्याचा वापर होतोय ते पाहता 'कृत्रिम बुद्धिमत्ता' हा शाप ठरत आहे. चक्क वृत्तवाहिन्यांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेच्या आधारे कृत्रिम माणसे तयार करून हुबेहूब दिसणाऱ्या माणसांप्रमाणे बातम्या वाचून दाखवतात. कोणाला कळणार देखील नाही की हा माणूस खरा नाही. अनेक राजकीय नेत्यांचे भलत्याच महिलांशी वेगवेगळ्या पोझिशनमध्ये नाते जोडल्याचे दाखविले जात आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेचा एवढ्या प्रमाणात गैरवापर होत आहे की त्यातून अनेक घरांमध्ये भांडण तंटे निर्माण झाले. जे खरे नाही, ते खरे असल्यासारखे दाखवण्याचा प्रयत्न चालू आहे. एखाद्या व्यक्तीच्या आवाजाची नक्कल करून त्याचे फोटो घेऊन त्या आधारे त्या व्यक्तीचे भाषण तयार करून वाटेल ती निवेदने त्यांच्या तोंडी घातली जात आहेत. त्यातून अनेकजण फसले जात आहेत. आता बिहारची निवडणूक चालू आहे, बिहारमध्ये देखील 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स'चा वापर करून अनेक प्रकारचे व्हिडिओ तयार करून मतदारांमध्ये संभ्रम निर्माण करण्याचे प्रयत्न सुरू झाले आहेत. निवडणूक आयोगाने या संदर्भात कडक कारवाई करू, असा इशारा दिलेला आहे. समाज माध्यमांमध्ये सध्या बनावटगिरी फार वाढलेली आहे. 'एआय'चा वापर हा जनतेमध्ये संभ्रम निर्माण करण्यासाठी केला जात आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता हे वरदान आहे, परंतु त्याचा नको त्या ठिकाणी नको त्या प्रकारे वापर करून मोठे गैरसमज, संभ्रम, अस्थिरता समाजामध्ये निर्माण करण्याचा जो अश्लाघ्य प्रयत्न चालू आहे, त्या विरोधात केंद्र सरकारने आता काही महत्त्वाची पावले उचलली आहेत. ही कठोर पावले उचलल्यानंतर माहिती व प्रसारण मंत्रालयाने माहिती व तंत्रज्ञानाच्या नियमांमध्ये काही बदल करण्याचा प्रस्ताव तयार केला आहे. त्यामुळे मूळ माहिती व सिंथेटिक पद्धतीची सामग्री या वेगवेगळ्या केल्या जातील आणि समाज माध्यमातून खोटी माहिती पसरवण्याचा प्रयत्न तिथेच रोखला जाईल. त्याचबरोबर ५० लाखाहून अधिक वापरकर्ते असलेल्या मोठ्या समाजमाध्यम संस्थांना त्यांच्याकडे अपलोड होणारी माहिती खरी आहे की खोटी की सिंथेटिक पद्धतीची आहे? याबाबत माहिती घ्यावी लागेल. सिंथेटिक पद्धतीच्या माहितीवर तशा आशयाचे लेबल लावणे सक्तीचे केले जाणार आहे. हे लेबल स्पष्ट दिसणारे असायला हवे. त्यामुळे एखादा व्हिडिओ चित्रित केलेला असेल तर तो खरा आहे की कृत्रिम पद्धतीचा आहे, हे तो प्रसारित करताना त्यातील दहा टक्के भाग कृत्रिम आहे, हे दाखविणे बंधनकारक केले जाणार आहे.


थोड्या उशिरा ही पावले उचलली जात आहेत, परंतु ती योग्य दिशेने पडली आहेत. अनेक दंगली कृत्रिम बुद्धिमत्तेच्या गैरवापरातून झालेल्या आहेत. अनेकांनी आपले प्राण गमावलेले आहेत. अनेकांचे संसार देखील गैरसमजातून उद्ध्वस्त झालेले आहेत. हे प्रकार एवढे गंभीर आहेत की, यावर जर आळा बसला नाही तर सारे जग हे बनावटच होऊन जाईल. त्यातून खरे कोणते, खोटे कोणते? हे कळण्यास मार्ग राहणार नाही. कृत्रिम बुद्धिमत्तेचा म्हणजे चांगल्या तंत्रज्ञानाचा गैरवापर होतोय ही अत्यंत दुर्दैवाची बाब आहे. खोटी माहिती देणे, फसवणूक करणे, कोणाचे संबंध कोणाशीही जोडणे व जे शक्यच नाही ते शक्य असल्याचे चित्रीकरणद्वारे दाखविले जाते, या सर्वांचा परिपाक अत्यंत घातक बनत आहे. आजही जनतेमध्ये किंवा हुशार मंडळींमध्ये जी चर्चा होते त्यात त्याचे उत्तर सापडत नाही. कोणतीही यंत्रणा वाईट नसते, घातकही नसते. तिचा गैरवापर आणि नको तेवढा वापर घातक ठरत असतो. म्हणूनच आपल्याला याबाबत सातत्याने सतर्क राहणे आवश्यक आहे. सध्याची कृत्रिम बुद्धिमत्ता मर्यादित आहे, त्यामध्ये आणखी संशोधन होऊन ही यंत्रणा आपल्या घरात किचनपर्यंतदेखील पोहोचेल आणि त्यातून पुढे त्याचे दुष्परिणाम प्रत्येकाला भोगावे लागतील. म्हणूनच केंद्र सरकारने जे काही पाऊल उचलले आहे, त्या अनुषंगाने काही नियम तयार करण्याचा निर्णय घेतला आहे त्याचे खरे तर स्वागतच झाले पाहिजे. यंत्रणा चांगली असली म्हणून होत नाही, त्यावर कोणाचे तरी नियंत्रण आवश्यक असते, नाहीतर सर्व ठिकाणी बेबंदशाही होऊन बसेल.

# अंबाजोगाईत आजपासून देवी भागवत ज्ञानयज्ञ सोहळा

## आ. नमिताताई मुंदडा यांच्या हस्ते कलश यात्रेचा शुभारंभ: ५०० महिलांच्या सहभागाने भव्य कलश यात्रा

अंबाजोगाई । प्रतिनिधी

**गुरुदेव सर्वश्री आशुतोष महाराजजी यांच्या दिव्य मार्गदर्शनाखाली दिव्य ज्योति जाग्रती संस्थान शाखा लातूरतर्फे आयोजित श्रीमद्? देवी भागवत महापुराण ज्ञानयज्ञ कथेची सुरुवात आज भव्य आणि दिव्य अशा कलश यात्रेने झाली.**



या कलश यात्रेचा शुभारंभ मा. आमदार सौ. नमिताताई मुंदडा यांच्या हस्ते करण्यात आला. विशेष म्हणजे ५०० महिलांनी डोक्यावर पवित्र कलश घेऊन यात्रेत सहभाग नोंदविला. हे दृश्य अत्यंत भव्य, भाविकांच्या भक्तिभावाने नटलेले आणि दर्शनास विलोभनीय असे होते. यात्रेच्या मार्गावर उभा असलेला नागरिक भावविश्वात हरवून या यात्रेचे कौतुक करीत होता. देवीची विशाल प्रतिमा असलेला रथ, धार्मिक झांज-पथके व भक्तीमय घोषणांनी संपूर्ण शहर दुमदुमून गेले. आध्यात्मिकतेचा आणि स्त्रीशक्तीचा संगम या यात्रेमध्ये सुंदररीत्या अनुभवायला मिळाला. या यात्रेनंतर आज दि.२५ ऑक्टोबरपासून श्रीमद्? देवी भागवत महापुराण ज्ञानयज्ञ कथेचा शुभारंभ होणार आहे. साध्वी अदिति भारती जी (शिष्या सर्वश्री आशुतोष महाराजजी) यांच्या सुमधुर वाणीमधून कथा दि.२५ ते ३१ ऑक्टोबर या कालावधीत दररोज सायंकाळी ३ ते ७ या वेळेत योगेश्वरी महाविद्यालय ग्राउंड, अंबाजोगाई येथे होणार आहे. या सात दिवसीय ज्ञानयज्ञातून समाजात भक्ती, ब्रह्मज्ञानाचा संदेश पोहोचविण्याचा उद्देश असून दिव्य ज्योती परिवाराने सर्व भाविकांना या दिव्य सोहळ्याचा लाभ घ्यावा असे आवाहन केले आहे.

# निवडणुका स्वतंत्र लढण्यावर भाजप कार्यकर्त्यांचे एकमत

माजलगाव । प्रतिनिधी

**आगामी नगरपालिका निवडणुका भारतीय जनता पक्षाने स्वतःच्या ताकदीवर लढवाव्यात याबाबत इच्छुकांच्या घेतलेल्या बैठकीत भाजप कार्यकर्त्यांची एकमत झाले असून भाजप कार्यकर्त्यांचा रोख पाहता आगामी नगरपालिका निवडणुकीत भाजप स्वतंत्र निवडणुका लढण्यावर ठाम असल्याचे दिसून येते.**



भारतीय जनता पक्ष माजलगाव च्या वतीने दि २४ ऑक्टोबर शुक्रवार रोजी आगामी नगरपालिका निवडणूक इच्छुक उमेदवारांच्या मुलाखतीचे आयोजन करण्यात आले होते यावेळी भाजप जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख, जेष्ठ नेते स्वरूप सिंह हजारी, हिंदूलाल काकडे, शांतिनाथ डोरले, युवा मोर्चा अध्यक्ष संजय आंधळे, अरुण राऊत,माजी नगराध्यक्ष अशोक तिडके,माजलगाव शहर तालुका अध्यक्ष विनायक रत्नपारखी, रूपाली कचरे,अभिजीत सोळंके यांच्यासह माजलगाव मधील सर्वच ज्येष्ठ भाजप नेत्यांची उपस्थिती होती यावेळी इच्छुकांची मोठी गर्दी झाल्याचे दिसून आले महायुतीत स्थानिक चे आमदार भाजप कार्यकर्त्यांना विश्वासात न घेता कारभार करत असल्याने त्यांच्याविषयी नाराजीचा सुर बैठकीत दिसून आला. आगामी नगरपालिका निवडणुका भारतीय जनता पक्षाने स्वतःच्या जीवावर लढवाव्यात असा कार्यकर्त्यांचा आग्रह आहे.पक्ष निरीक्षक व ज्येष्ठ भाजप नेत्यांनी भाजप कार्यकर्त्यांच्या भावना समजावून घेत पक्षाच्या ज्येष्ठ नेत्यांकडे योग्य तो संदेश पोहोचवणार असल्याचे त्यांनी याप्रसंगी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाचे प्रास्ताविक भाजपा माजलगाव शहर तालुका अध्यक्ष विनायक रत्नपारखी, सूत्रसंचालन पवन मोगरेकर यांनी केले. बैठकीचा अध्यक्षीय समारोप जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख यांनी केले. याप्रसंगी भाजप बूथ अध्यक्ष शक्तिकेंद्र प्रमुख यांच्यासह प्रमुख भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

## पान ६ वरून...

### जातीयवादाला बळी न पडता

वंचित ठेवण्याचा प्रयत्न सरकारने केला. ज्या शेतकऱ्यांच्या विहिरी नदीकाठी आहे अशा वाहून गेलेल्या विहिरींना अनुदान मिळणार नाही असे बोलले जाते. कोणताही शेतकरी विहीर खोदताना ज्या ठिकाणी पाणी लागेल अशा ठिकाणी विहिरी खोदतो. पाण्याची हमी म्हणून कित्येक वर्षापासून शेतकरी नदीकाठी विहीर खोदतात. याचे भान शेतकऱ्यांनी ठेवले नाही. शेतकऱ्यांविषयी त्यांच्या मनात असता राहिलेली नाही. अतिवृष्टी परिस्थितीत ही राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाने आपतग्रस्तांना मदतीचे काम केले आहे. ज्या ज्या वेळीअन्याय अत्याचार होतो तेव्हा पक्षाने विरोधकाची भूमिका प्रभावीपणे मांडली. स्वर्गीय संतोष देशमुख आत्या प्रकरणात आपले आमदार संदीप क्षीरसागर यांच्या आक्रमक भूमिकेमुळे सर्व आरोपी जेलबंद झाले. त्यांना या प्रकरणात राजकीय किंमत मोजली परंतु देशमुख कुटुंबांना उघड पडू दिलं नाही न्याय हक्कासाठी जगत आहेत. असे विचार राजेंद्र मस्के यांनी यावेळी मांडले. पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा माजी आमदार सय्यद सलीम भाई या बैठकीस मार्गदर्शन करताना म्हणाले की, विरोधक कोणता मुद्दा व कोणते धोरण घेऊन लोकांच्या समोर जाणार आहेत. गटातटाच्या राजकारणात गुंतलेले असून, राजकीय स्वार्था शिवाय त्यांना विकासाचे देणे घेणे नाही. आपल्याकडे आश्वासक चेहरा आपले लोकप्रिय आमदार संदीप क्षीरसागर आहेत. आपत्तीग्रस्त परिस्थितीत त्यांनी लोकांना केलेली मदत दिलेला आधार जनतेने अनुभवला. जनतेचा कौल अन्याया विरुद्धात आहे. यामुळेही या निवडणुका कार्यकर्त्यांसाठी सोपे आहेत कार्यकर्त्यांनी जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गणातील मतदार बांधवांची थेट संपर्क वाढवावा. असे आवाहन केले आहे. या बैठकीस ज्येष्ठ नेते डि. बी. बागल, वैजनाथ तांदळे, के. के. वडमारे, शिवराज बांगर, मदन जाधव सर, माऊली दादा, हांगे दादा,धनंजय जगताप, मिलन बापू मस्के, बाळासाहेब गोरे, खुर्शीद आलम,यांसह तालुक्यातील सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते, गावागावातील जबाबदार सहकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

----------

### सुरेश धस आमदार व्हावेत

नेहमी अशा धडाडीच्या आणि प्रामाणिक नेत्यांच्या पाठीशी उभे राहिले पाहिजे. त्यामुळेच आपल्या भागाला आमदार म्हणून त्यांची गरज होती आणि याच भावनेने मी हा नवस बोललो होतो.राज्याचे मुख्यमंत्री यांना विनंती आहे की ,माझा हा मेहनती, सतत जनतेसाठी लढणारा नेता मंत्रीपदी विराजमान करावेत असा मी पुन्हा त्यासाठी नवस बोलतो. येणाऱ्या काळात जर आमदार सुरेश धस मंत्री झाले तर मी मुख्यमंत्र्यांसह त्यांची याच स्वामी समर्थ गडावर पेढे तुला करेल. असेही शेवटी दातिर म्हणाले. या सोहळ्यासाठी चिंचोली गावात उत्सवी वातावरण निर्माण झाले होते. बैलगाड्यांची सजावट, श्री समर्थ महाराजांच्या जयघोषात काढलेली मिरवणूक आणि पारंपरिक वाद्यांच्या गजरात गावातून झालेली शोभायात्रा पाहण्यासारखी होती. या नवस्फूर्ती सोहळ्या निमित्ताने उपस्थित त्यांना सचिन दाते यांच्याकडून महापंगत देऊन महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या व्यासपीठावर माजी आमदार साहेबराव दरेकर नाना, संदीप खकाळ, राजेंद्र दहातोंडे, अंकुश चव्हाण, अशोक लगड, रवींद्र ढोबळे, रामेश्वर चव्हाण, सरपंच हनुमंत अडागळे, संपत कोळेकर, उद्धव कर्डीले आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन बन्सोडे सर यांनी केले.यावेळी कांतीलाल देवकर,शिवलाल थोरवे, रोहिदास जगताप, आप्पासाहेब देवकर, संतोष देवकर,सागर जगताप, महेश जगताप, हनुमंत अडागळे, हिम्मत बाबर, उद्धव कर्डिले, बलभीम दातीर, अनिल दातीर,विजय कापरे, भीमराव देवकर, शांतीलाल चोरमले, जावेद शेख,अंकुश एकशिंगे, कानिफ एकशिंगे, सुदाम दातीर, बाजीराव गवळी यांच्यासह सर्वसामान्य नागरिक, महिला, युवक आणि वयोवृद्ध मोठ्या संख्येने या कार्यक्रमात सहभागी झाले.

----------

### गोड ऊसाचे कडू दर्शन

घेऊन जावे अशी मागणी शेतकऱ्यांकडून केली जात आहे. आधीच नैसर्गिक अतिवृष्टीने व अतिरिक्त पावसामुळे पहिले शेतकरी हातबल झाल्याचे चित्र पाहावयास मिळत आहे शेतकरी बांधव मोठ्या आस्मानी व सुलतांनी संकटात सापडलेला आहे यामुळे शेतकरी पुरता हतबल झाला आहे. या संदर्भात तलवाडा पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती.

----------

### सामाजिक न्यायमंत्री संजय

आणि पुन्हा जोमाने पक्ष कार्य सुरू करा. शिवसेना कायम तुमच्या पाठीशी आहे अशा शब्दांत त्यांनी मनापासून मुळूक यांना शुभेच्छा दिल्या.यावेळी शिवसेनेचे जिल्हा प्रमुख अनिल जगताप, शिवसैनिक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी एकदिलाने सचिन मुळूक यांच्या प्रकृतीत लवकर सुधारणा व्हावी अशी कामना व्यक्त केली.

----------

## पान १ वरून...

### सोयाबीनची खरेदी

अडचणीत आले आहेत. त्यामुळे सोयाबीनची खरेदी तातडीने सुरु करावी, अशी मागणी शेतकरी करत आहेत.

----------

### चालू हंगामासाठी

रणदिवे, पप्पू पाटील, मोसिन पटेल, धाराशिव जिल्हाध्यक्ष रवींद्र इंगळे, तालुका अध्यक्ष दुर्वास भोजने, मकबूल मुल्ला, गोकुळ शिंदे, युवराज नवाडे, राजाराम सुरवसे इत्यादी स्वाभिमानीचे पदाधिकारी उपस्थित होते. शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली ही ऊस परिषद मोठ्या उत्साहात पार पडली. या वेळी तुळजापूर,उमरगा व अक्कलकोट तालुक्यातील ऊस उत्पादक शेतकरी खूप मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी राजू शेट्टी यांनी विविध विषयावर शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले तर सर्व कारखान्यांना इशारा देखील दिला की, जर शेतकऱ्यांना त्रास दिला किंवा थकीत बिले ताबडतोब दिले नाही तर उग्र आंदोलन करण्यात येईल. उसाला ३४०० रुपये पहिली उचलीची मागणी राजु शेट्टी यांनी केली. तसेच सोयाबीन हमीभाव केंद्राने सुरु करावा. मागील हंगामातील एफआरपी तत्काळ जमा करावा आणि एफआरपी थकविणाऱ्या साखर कारखाण्यावर एफआरआय दाखल करावा. अतिवृष्टीच्या नुकसान भरपाईमध्ये वाढ करून प्रति हेक्टरी ५० हजार त्वरित द्यावी, असे राजू शेट्टी यांनी सांगितले. यावेळी रविंद्र इंगळे, शहाजी सोमवंशी, विजय रणदिवे आधी मान्यवरांची भाषणे झाली.

**या आहेत प्रमुख मागण्या**

सर्व कारखानदारांनी मागील हंगामातील थकीत ऊस बिले तात्काळ अदा करा, सर्व कारखानदाराने चालू हंगामातील एफआरपी जाहीर करा, सरसकट संपूर्ण कर्जमाफी झालीच पाहिजे, अतिवृष्टी नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांना अधिकचे भरीव अनुदान मंजूर करावे, सोयाबीनची शासकीय खरेदी लवकरात लवकर सुरू करावी.

----------

### मुलीच्या मृत्यूस जबाबदार

आपल्यावर बलात्कार झाल्याचे लिहिले. त्यात तिने पोलीस उपनिरीक्षक गोपाल बदनेचे नाव लिहिले. पोलीस उपनिरीक्षक बदनेने चारवेळा बलात्कार केल्याचे सुसाईड नोटमध्ये लिहिण्यात आले आहे. तसंच प्रशांत बनकर नावाच्या कर्मचाऱ्यानेही मानसिक त्रास दिल्याचे सुसाईड नोटमध्ये म्हटले आहे. सदरील महिला डॉक्टरवर पोलिसांचा आणि वरिष्ठांचा दबाव होता. तीने खोटी साक्ष द्यावी, त्यांच्या ऐकण्यातील काम करावे. यासाठी सतत तिच्यावर दबाव होता. त्यामुळेच तिने आत्महत्या केल्याचे समोर आले आहे. दिवाळीत सुट्ट्या नसल्याने पीडित महिला डॉक्टर पुढच्या आठवड्यात घरी येणार होती अशी माहिती समोर आली आहे. पण त्या आधीच तिने टोकाचे पाऊल उचलले. दरम्यान, फलटण उपजिल्हा रुग्णालयातील महिला डॉक्टर आत्महत्या प्रकरणाची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस समजताच त्यांनी संबंधित पोलीस अधिकाऱ्याला तत्काळ निलंबित करण्याचे आदेश दिले असून, आरोपींवर कठोर कारवाई करण्याचेही निर्देश दिले. यानंतर गोपाळ बदनेचे तात्काळ निलंबन करण्यात आले आहे.

---------

### सीटीईटी परीक्षेची

जावा आणि योग्य ज्ञान व कौशल्ये असलेले शिक्षकच निवडले जावेत. ही परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर उमेदवारांना मिळणारे प्रमाणपत्र केंद्र सरकारच्या शाळांमध्ये (उदा. केंद्रीय विद्यालय, नवोदय विद्यालय) तसेच अनेक राज्य सरकारी आणि खासगी शाळांमध्ये शिक्षक भरतीसाठी अनिवार्य मानले जाते. या परीक्षेचे प्रमाणपत्र मिळाल्यास उमेदवारांना केंद्रीय शिक्षण संस्थांमध्ये आणि अनेक राज्यांमध्ये शिक्षक पदासाठी अर्ज करण्याची पात्रता मिळते. हे प्रमाणपत्र आता आजीवन वैध असते. परीक्षा दोन स्तरांवर घेतली जाते आणि ज्या उमेदवारांना शिक्षण क्षेत्रात जायचे आहे ते यात सहभागी होतात.

----------

### वडिलांचा मालमत्ता करार मुलगा १८ वर्षांचा

परवानगीशिवाय हे भूखंड विकले. मुलगे सज्ञान झाल्यावर त्यांनी ते भूखंड के.एस. शिवप्पा यांना विकले. यापूर्वी भूखंड खरेदी करणाऱ्या तिसऱ्या पक्षांनी मालमत्तेवर मालकी हक्क सांगितल्याने कायदेशीर वाद निर्माण झाला होता. अखेर हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयापर्यंत पोहचले कारण अल्पवयीन मुलांना मूळ विक्री रद्द करण्यासाठी खटला दाखल करणे आवश्यक आहे की नाही, यावर कनिष्ठ न्यायालयांमध्ये मतभेद होते.

---------

### बदामराव पंडित जाणार

करू, गेवराई नगर पालिकेच्या बाबतीत पंकजाताई आदेश देतील त्या प्रमाणे काम करणार असल्याचे पंडित यांनी सांगितले. भाजप प्रवेशाची तारीख लवकरच निश्चित करून प्रवेश करणार असल्याचे बदामराव पंडितांनी सांगितल्याने गेवराईत नवीन राजकीय समिकरणे पहायला मिळणार आहेत.

----------------

### आदित्य ठाकरेही फोडणार

उपविभागप्रमुख आणि शाखाप्रमुख उपस्थित राहणार आहेत. आदित्य ठाकरे या कार्यक्रमात मल्टिमीडियाच्या माध्यमातून सादरीकरण करणार असून, मुंबईतील मतदार याद्यांमधील त्रुटी आणि बोगस नोंदींचे पुरावे ते दाखवतील, अशी माहिती समोर आली आहे. या सादरीकरणात शिवसेनेच्या तज्ञ टीमने मतदार नोंदणीतील पॅटर्न, अचानक वाढलेले मतदान क्रमांक आणि बाहेरील राज्यातील मतदारांची नावे यांचा तपशील तयार केला आहे. सूत्रांनुसार, हे केवळ मतदार यादीतील चुकाच नाहीत, तर नियोजनबद्ध फेरफार आहेत, असा दावा ठाकरेंच्या गटाकडून केला जाण्याची शक्यता आहे.

----------

### देशात पहिल्यांदाच एका

प्रत्यारोपण करण्याची ही पहिलीच वेळ आहे. देशात फुफ्फुस प्रत्यारोपण ही एक अत्यंत दुर्मिळ शस्त्रक्रिया मानली जाते. दान केलेल्या अवयवांमध्ये हृदय, फुफ्फुस, दोन्ही मूत्रपिंडे, स्वादुपिंड, यकृत, एक हात आणि दोन्ही कॉर्निया यांचा समावेश होता. यापैकी एक मूत्रपिंड, हृदय आणि फुफ्फुस कोट्टायम मेडिकल कॉलेजमधील रुग्णांना प्रत्यारोपित करण्यात आले. बुधवार, २२ ऑक्टोबर रोजी रात्री ८:३० वाजता ही शस्त्रक्रिया सुरू झाली आणि पहाटे २:३० वाजेपर्यंत चालली. त्यानंतर अवयव इतर रुग्णांमध्ये प्रत्यारोपण करण्यात आले. २३ ऑक्टोबर रोजी दुपारी ही शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण झाली.

------------

### भुजबळांचा जामीन रद्द करुन मंत्रिमंडळातून

साहेब, लोकांनी तुमच्यावर मोकळ्या मनाने प्रेम केले आहे. तुम्ही मोठ्या मनाने जीआर काढला, पण भुजबळ त्याला विरोध करताहेत. तुमच्या बळाशिवाय ते असे करुच शकत नाहीत. जरांगे यांनी स्पष्ट मागणी केली की, भुजबळांचा जमीन रद्द करुन त्यांना मंत्रिमंडळातून बाहेरचा रस्ता दाखवा. तसेच, येत्या कॅबिनेट बैठकीत सातारा संस्थांचे गॅझेट काढा. आता आमच्यात थांबायची क्षमता नाही. सरकारने विलंब केला, तर आम्ही पुन्हा निर्णायक आंदोलन छेडू. मराठा समाजाची सहनशीलता आता संपत आली आहे असेही जरांगे पाटलांनी यावेळी स्पष्ट केले.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शनिवार दि. २५ ऑक्टोबर २०२५


## रसिक फाउंडेशनच्या वतीने पाडवा पहाटचे आयोजन

**बीड । प्रतिनिधी**

रसिक फाउंडेशन फाउंडेशनच्या वतीने दिवाळीच्या पाडव्याला आयोजित पाडवा पहाट या कार्यक्रमात पुणे येथील युवा गायक निषाद व्यास आणि राधिका जोशी यांनी आपल्या सुमधुर गायनाने रसिक श्रोत्यांना मंत्रमुग्ध करीत बीडकरांची दिवाळी सुरेल करीत दीपावलीचा आनंद द्विगुणीत केला. येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहांमध्ये प्रतिवर्षाप्रमाणे रसिक फाउंडेशनच्या वतीने गायनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते .प्रारंभी अतिथी कलावंत आणि रसिक फाउंडेशनच्या संचालकांच्या हस्ते सरस्वतीच्या प्रतिमेचे पूजन आणि दीप प्रज्वलन करण्यात आले .या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विकास उमापूरकर , आभारप्रदर्शन अमर डागा यांनी तर प्रास्ताविक डॉ. अनुराग पांगरीकर यांनी केले .यानंतर निषाद व्यास आणि राधिका जोशी यांच्या गायनास प्रारंभ झाला त्यांना हार्मोनियमवर माधव लिमये ,तबल्यावर तुकाराम जाधव ,पखवाजवर माऊली फाटक,बासरीवर धवल जोशी आणि मंजिरीवर प्रशांत कळमकर यांनी साथ केली.

# बीडकरांची दिवाळी नवीन घरकुलात

## घरकुल बांधणीत जिल्ह्याने रचला नवा विक्रम!; ५० हजारांहून अधिक घरकुलांची पूर्ती करणारा बीड जिल्हा राज्यात प्रथम!

बीड । प्रतिनिधी

'दिवाळी नवीन घरकुलात' या उपक्रमांतर्गत बीड जिल्ह्याने राज्यात विक्रमी कामगिरी केली आहे. प्रधानमंत्री आवास योजना (पीएमएवाय) तसेच राज्य पुरस्कृत घरकुल योजनेअंतर्गत बीड जिल्ह्यातील ५० हजारांहून अधिक घरकुले विक्रमी वेळेत पूर्ण करण्यात आली असून, या निमित्तानं बीडकरांचे हक्काच्या घरात राहण्याचे स्वप्न साकार झाले आहे. या कामासाठी सरकारमार्फत ९९० कोटींचा निधी वितरित करण्यात आला आहे. या कामगिरीमुळे बीड जिल्ह्याने संपूर्ण राज्यात प्रथम क्रमांक मिळवत नवा विक्रम रचला आहे. या ऐतिहासिक कामगिरीबद्दल बीड जिल्ह्याचे पालकमंत्री तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी, बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, यंत्रणेतील सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांसह लाभार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार पुढे म्हणाले की, ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबाला हक्काचे घर मिळावे, हीच या उपक्रमामागची प्रेरणा आहे. बीड जिल्ह्यातील हजारो कुटुंबांनी यंदाची दिवाळी आपल्या नव्या घरकुलात साजरी केली, हीच या योजनेची खरी यशोगाथा आहे. प्रशासनातील अधिकारी-कर्मचाऱ्यांनी दाखविलेली समर्पणभावना, नियोजन आणि सातत्यपूर्ण पाठपुरावा हेच या योजनेच्या यशस्वीतेचे रहस्य आहे. काटेकोर नियोजन, दैनंदिन देखरेख आणि टीमवर्कचा हा विजय आहे. या उपक्रमासाठी जिल्हा प्रशासनाने विकसीत केलेल्या 'पीएमएवाय (सॉफ्ट) ॲप'चा मोठा




वाटा आहे. या ॲपद्वारे प्रत्येक अधिकाऱ्याला विशिष्ट प्रभागाची जबाबदारी देण्यात आली होती. लाभार्थ्यांशी सतत संपर्क ठेवून बांधकाम सुरू ठेवण्यास त्यांना प्रोत्साहित करण्यात आले. सूक्ष्म नियोजन, दैनंदिन पाठपुरावा आणि निधीचे वेळेत वितरण या त्रिसूत्रीमुळेच हे उद्दिष्ट चार महिन्यांत पूर्ण करणे शक्य झाले. बीड जिल्हाधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली बांधकामासाठी वाळू उपलब्धता, आंतरविभागीय समन्वय व बांधकाम प्रक्रियेसाठी आवश्यक सुविधा वेळेवर पुरविण्यात आल्या. ग्रामीण गृहनिर्माण हा शासनाचा प्राधान्याचा विषय असून, राज्य व केंद्र पुरस्कृत या योजनांना बीड जिल्ह्यात विशेष गती देण्यात आली. शाश्वत विकासाच्या ध्येयाशी निगडित या उपक्रमात ''दिवाळीपूर्वी प्रत्येक लाभार्थ्याला हक्काचे घर मिळावे'' या उद्देशाने नियोजन करण्यात आले. बीड जिल्ह्याची स्थलांतराची पार्श्वभूमी लक्षात घेता, ऊसतोडीपूर्वीच कुटुंबांना घर मिळावे या दृष्टीने कामांना वेग देण्यात आला. परिणामी, हजारो कुटुंबांना या दिवाळीत नवीन घराचा आनंद लाभला आहे. प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत महाराष्ट्राला अधिकचे उद्दिष्ट मंजूर करून देऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राज्यातील सर्वसामान्य कुटुंबांच्या घरकुल स्वप्नाला नवे बळ दिले आहे. राज्य सरकारतर्फे त्यांच्या या निर्णयाबद्दल मी त्यांचे मनःपूर्वक आभार मानतो. ते पुढे म्हणाले, बीड जिल्ह्यातील प्रत्येक कुटुंबाच्या डोक्यावर हक्काचे छप्पर यावे, हे आमचे पुढचे ध्येय आहे. यासाठी ही योजना आणखी वेगाने आणि प्रभावीपणे राबविण्यात येईल. बीड जिल्ह्यातील कोणतेही पात्र कुटुंब हक्काच्या घराशिवाय राहणार नाही, यासाठी शासन कटिबद्ध आहे. बीड जिल्ह्यातील प्रत्येक नागरिकांच्या, प्रशासनातील अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने बीड जिल्ह्याने हे यश मिळवले आहे. यापुढे सुध्दा बीडच्या सर्वांगीण विकासासाठी कटीबद्ध असल्याची ग्वाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली आहे. तसेच त्यांनी या यशात मोलाचा वाटा उचलणाऱ्या सर्व अधिकारी-कर्मचारी, लोकप्रतिनिधी, बीड जिल्हा परिषद, तसेच लाभार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करत सर्वांना दिवाळीच्या मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या आहेत.

**ठळक वैशिष्ट्ये :–** बीड जिल्ह्यात ''दिवाळी नवीन घरकुलात'' उपक्रमांतर्गत ५० हजारांहून अधिक घरकुल पूर्ण, सरकारमार्फत ९९० कोटी निधी वितरित, बीड जिल्हा महाराष्ट्रात प्रथम, चार महिन्यांत ४० हजार घरकुले पूर्ण, काटेकोर नियोजन आणि दैनंदिन पाठपुराव्यामुळे यश, महाराष्ट्राला अधिक उद्दिष्ट मंजूर केल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे राज्य सरकारतर्फे आभार, प्रत्येक पात्र कुटुंबाला हक्काचे घर मिळवून देण्यासाठी योजना अधिक वेगाने राबविणार

## महापुरुषांचे आशीर्वाद घेऊन पूजा कांबळे तेलगाव जि.प.गटातून निवडणूक लढवण्याच्या तयारीत

दिंद्रुड । प्रतिनिधी

येथून जवळच असलेल्या श्री क्षेत्र देव दहिफळे येथे मातंग समाजाची भव्य निर्धार बैठक पार पडली. यामध्ये तेलगाव जिल्हा परिषद गटातून युवा नेते बाबा कांबळे यांनी निवडणूक लढवावी अशी मागणी सर्वानुमते करण्यात आली. शेतकरी, कष्टकरी, ऊसतोड कामगार व डोंगरपट्ट्यातील सामान्य लोकांचे प्रश्न सोडवण्यासाठी आपण ही निवडणूक लढवू आणि जिंकू सुद्धा असा एल्गार बाबा कांबळे यांनी महापुरुषांचे आशीर्वाद घेऊन केला. यावेळी सर्कलमधील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



सामाजिक चळवळीतील निष्ठावंत कार्यकर्ता म्हणून बाबा कांबळे जिल्हाभरात सुप्रसिद्ध आहेत. छत्रपती शिवाजी महाराज, लहुजी वस्ताद साळवे, महात्मा ज्योतिबा फुले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे आदी महापुरुषांचे विचार केवळ बोलण्या पुरतेच नाही तर ते आचरणात आणून सामाजिक सलोखा व बंधुभाव कायम राहिला पाहिजे यासाठी कांबळे प्रयत्नशील असतात. नुकतीच धारूर तालुक्यातील देवदहिफळ येथे मातंग समाजाची व्यापक निर्धार बैठक पार पडली. यामध्ये सर्वांनी बाबा कांबळे यांनी तेलगाव जि.प. गटातून निवडणूक लढवावी अशी जोरदार मागणी केली. बाबा कांबळे यांचे संघटन व समाजातील उपेक्षित घटकांसाठी काम करण्याची तळमळ सर्वश्रुत आहे. सर्व जाती धर्माच्या लोकांना सोबत घेऊन काम करणारा कांबळे हा अजातशत्रू कार्यकर्ता आहे.

तेलगाव जिल्हा परिषद गट हा अनुसूचित जातीच्या महिलासाठी आरक्षित असल्यामुळे कांबळे यांच्या सुविद्य पत्नी सौ. पूजा कांबळे यांची उमेदवारी प्रबळ समजली जाते. त्यांची उमेदवारी विजयाच्या दृष्टिकोनातून परिणामकारक राहील अशी चर्चा मतदार संघात आहे. त्यांची उमेदवारी सर्व दृष्टिकोनातून सक्षम असल्यामुळे त्यांनी निवडणूक लढवावी अशी मागणी सदरील बैठकीत करण्यात आली.



## ठेचा भाकर खात शासनाच्या नावाने बोंबा मारुन शेकापने केला शिमगा

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील पवारवाडी शिवारात शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने बळीराजाच्या प्रतिमेचे पूजन करून ठेचा भाकर खाऊन ऐन दिवाळीत शासनाच्या नावाने शिमगा केला यावेळी शेतकऱ्यांची फसवणुक करणाऱ्या देवेंद्र फडणवीससह सरकारचा बोंबा मारुन निषेध करण्यात आला.यावेळी शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई ॲड.नारायण गोले पाटील यांच्यासह भाई मुंजा पांचाळ,भाई अशोक कुलकर्णी, भाई सतिश शेजुळ, भाई राहुल सोळंके, भाई सलीम पठाण, भाई चांगदेव शेजुळ, भाई कौस्तुभ जोशी, भाई लक्ष्मण चव्हाण, भाई विष्णू शेळके, भाई अभिषेक सोळंके, विकास आढाव, राधाकृष्ण पांचाळ, गणेश देशमुख, सचिन शेजुळ अमोल कुलकर्णी, भाई भास्कर कांबळे, भाई मनोहर माने, चंद्रकांत खामकर, किसनराव नाईकनवरे, राधाकृष्ण नाईकनवरे आदि उपस्थित होते.

## दिंद्रुडमध्ये दीपोत्सव साजरा

**दिंद्रुड । प्रतिनिधी**

**दीपावली पर्वाच्या निमित्ताने दिंद्रुड गावात प्रथमच ''मातृभूमी'' दीपोत्सव साजरा केला गेला, कर्तव्य आणि नोकरी निमित्ताने गावाबाहेर असणाऱ्या गावातील तरुणांनी मिळून मातृभूमी प्रतिष्ठानच्या माध्यमातून ग्रामदैवत खोलेश्वर मंदिर प्रांगणात या भव्य उत्सवाचे आयोजन केले होते.१५५१ पणती दिवे,३१ किलो भव्य रांगोळी,३१ किलो फुले यांच्या माध्यमातून खोलेश्वर मंदिर प्रकाशमान करत हा कार्यक्रम पार पडला.**



दिंद्रुडला आध्यात्मिक आणि सांस्कृतिक वारसा आहे,बाजार पेठेच गाव असल्याने गावात अनेक उपक्रम राबविले जातात, अशात दीपावली सणाच्या औचित्याने संस्कृती परंपरेतून गावाला नवं वैभव प्राप्त करून देण्यासाठी हा भाऊबीज दिवशी हा दीपोत्सव आयोजित करण्यात आला.

ज्यात हजारो महिला आणि गावकरी यांनी उपस्थिती दर्शवली,दिव्यांची भव्य आरास महिलांसाठी तर ड्रोन शूटिंग लहानग्यांमधे अधिक उत्साह वाढवणारे ठरले. मातृभूमी प्रतिष्ठानच्या वतीने शिरीषकुमार रामदासी,परशुराम लांडे,विशाल ठोंबरे,ज्ञानेश्वर ठोंबरे,सौरभ पासंगे,एकनाथ हंगरगे,पृथ्वीराज शर्मा,ईश्वर आप्पा गौंडर,शुभम बसेट,निखिल सपाटे,देवराज ठोंबरे,सिद्धेश भुजबळ,आकाश मुसळे,श्रीराम ठोंबरे,संदीप मुसळे,आदिनाथ कटारे,श्याम कटारे,आकाश सुरवसे,विजय कांबळे,यश गौंडर यांचा सहभाग होता तर ड्रोन शूटिंग साठी पांडुरंग कटारे यांचे विशेष सहकार्य लाभले.

## रामचंद्र धस दादांनी सुरू केलेली परंपरा पुढे अविरत चालू ठेवण्याचे काम आ.सुरेश धस हे करत आहेत

**आष्टी । प्रतिनिधी**

**दिवाळी पाडव्यानिमित्त आमदार सुरेश धस यांच्या निवासस्थानी आज वंचित, शोषित आणि भटके-विमुक्त समाजातील बांधवांसोबत दिवाळी सण मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आला.**

दरवर्षीप्रमाणे यंदाही समाजातील वंचित घटक मोठ्या उत्साहात आमदार सुरेश धस यांच्या निवासस्थानी एकत्र आले होते. दीन दलित, वंचित शोषित, समाजघटकांना मुख्य प्रवाहात आणण्याच्या उद्देशाने दिवाळीचा हा अनोखा सोहळा गेल्या अनेक





वर्षांपासून धस परिवार आयोजित करत आहे. आमदार सुरेश धस यांनी या निमित्ताने उपस्थितांशी संवाद साधत सांगितले की, ''शोषित-वंचित समाजघटकांच्या जीवनात उन्नतीची पहाट यावी, त्यांच्या मुलांच्या चेहऱ्यावर आनंदाचे हास्य फुलावे, हा आमचा सततचा प्रयत्न आहे. त्यांचे वडील स्व. रामचंद्र दादा धस यांनी सुरू केलेल्या या परंपरेला आजही आमदार धस पुढे नेत आहेत. समाजातील बालकांच्या चेहऱ्यावरचा आनंद पाहून स्वतःही आनंदित होणारे हे आगळेवेगळे व्यक्तिमत्व म्हणून आमदार धस ओळखले जातात. एकीकडे गोरगरीब वंचित लोकांना दिवाळीचा सण गोड करणारे लोकनेते आ सुरेश आण्णा धस तर दुसरीकडे पूर परिस्थितीचे कारण दाखवत कार्यक्रम रद्द करणारे नेते या दोन्ही गोष्टीची मतदारसंघात चांगलीच चर्चा रंगली.

## दिवाळीत आनंदाचे रंग, नितीन जुजगर यांची मानवतेची उब!

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव शहरातील जुजगर गल्ली येथे राहणारे सामाजिक कार्यकर्ते नितीन जुजगर यांनी दिवाळीनिमित्त समाजातील गरीब व वंचित कुटुंबांतील मुला-मुलींना नवीन कपडे भेट देत सणाचा खरा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर आणला. आर्थिक अडचणीत सण साजरा करणे कठीण असलेल्या कुटुंबांसाठी हा उपक्रम आनंदाचा किरण ठरला.



नितीन जुजगर हे गेल्या अनेक वर्षांपासून माजलगाव व परिसरात विविध सामाजिक उपक्रम राबवत आहेत. गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत, रक्तदान शिबिरे, वृक्षारोपण, तसेच आरोग्यविषयक उपक्रमांच्या माध्यमातून ते समाजात सकारात्मक बदल घडवण्याचा प्रयत्न करत आहेत.

दिवाळीसारख्या सणाला गरीबांच्या चेहऱ्यावर हास्य आणण्याचा त्यांचा हा प्रयत्न समाजातील संवेदनशीलतेचा सुंदर प्रत्यय देणारा आहे. स्थानिक नागरिकांनी त्यांच्या या उपक्रमाचे मनःपूर्वक कौतुक केले असून, ''दिवाळीचा खरा अर्थ म्हणजे इतरांच्या आयुष्यात प्रकाश पसरवणे,'' असे मतही व्यक्त करण्यात आले.

## श्रीक्षेत्र कपिलधार येथे बलिप्रतिपदेनिमित्त महा रुद्राभिषेक, सेज पूजा व दीपोत्सवाचा दिव्य सोहळा

**बीड । प्रतिनिधी**

**बलिप्रतिपदा पाडव्याच्या शुभमुहूर्तावर श्रीक्षेत्र कपिलधार येथील श्री संत शिरोमणी मन्मथ स्वामी यांच्या संजीवन समाधीस्थळी अत्यंत भक्तिभावाने महा रुद्राभिषेक व सेज पूजेचा दिव्य सोहळा पार पडला. दीपावलीच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण मंदिर परिसर सुवासिक फुलांच्या आरासीत सजवण्यात आला होता, तर हजारो दिव्यांच्या प्रकाशाने संपूर्ण परिसर उजळून निघाला होता.**



या पवित्र दिवशी सकाळी लवकर मंत्रोच्चार, वेदमंत्र आणि पुरोहितांच्या सान्निध्यात रुद्राभिषेक विधी पार पडला. त्यानंतर सेज पूजा व दीपोत्सव कार्यक्रम पार पडला. भक्तांच्या जयघोषाने आणि ''मन्मथ स्वामींच्या जयघोषाने'' वातावरण भारावून गेले होते. या मंगल सोहळ्यास मोठ्या संख्येने भाविकांनी उपस्थित राहून दर्शनाचा लाभ घेतला.विशेषतः या पूजेसाठी बालाघाटचे युवा उद्योजक अशोक (दादा) रसाळ, पंडित रसाळ सहपरिवार, तसेच दत्त संस्थानचे मठाधिपती श्री वैजिनाथ महाराज शिंदे, मन्मथ स्वामी देवस्थानचे पूजा पुरोहित श्री विश्वनाथ स्वामी महाराज, डॉ. त्रिंबक नागनाथ स्वामी कपिलधार,आणि दै. लोकमंथनचे जिल्हा प्रतिनिधी व महाराष्ट्र राज्य पत्रकार संघटना मुंबई, बीड जिल्हा सहसचिव अमोल शिंदे सहपरिवार यांनी उपस्थित राहून श्री संत शिरोमणी मन्मथ स्वामींचे दर्शन घेतले व मनोभावे पूजा केली.मंदिराची फुलांनी सजवलेली आरास आणि दिव्यांची लखलखीत रोषणाई पाहण्यासाठी दूरदूरवरून भाविकांनी कपिलधार गाठले. संध्याकाळी आरती व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. भक्तांनी दीपोत्सवाचा आनंद घेत 'जय मन्मथ स्वामी' च्या जयघोषात संपूर्ण कपिलधार भक्तिरसात न्हाऊन निघाले. या निमित्ताने कपिलधार क्षेत्रात उत्सवी आणि पवित्र वातावरण निर्माण झाले होते. भाविकांच्या श्रद्धा, भक्ती आणि आनंदाने भरलेला हा दिव्य सोहळा सर्वांच्या मनात कायमचा कोरला गेला.

## स. निबंधक जगदाळेसह शेरखानेच्या निलंबनासाठी शेकापचे शिमगा आंदोलन

माजलगाव । प्रतिनिधी

सहाय्यक निबंधक सहकारी संस्था ही सहकारी संस्थेच्या कार्यभारावर नियंत्रण ठेवणारी संस्था असून माजलगाव तालुक्यातील मराठवाडा अर्बन को आप क्रेडिट सोसायटीत गैरव्यवहार झाल्याबाबत संचालका सह कर्मचाऱ्यांवर गुन्हे दाखल झाले संस्थेवर प्रशासक नियुक्त करण्यात आले असून ठेवीदारांच्या ठेवी वसुलीतुन परत मिळविण्याच्या आशा पल्लवित झाल्याने अनेक ठेवीदार हे प्रशासक सतिश शेरखाने यांचे सह सहायक निबंधक यांच्या कार्यालयाचे दरवाजे झिजवुन कंटाळले तर काही गरीब ठेवीदारांच्या कुटुंबावर उपासमारीची वेळ आली,खरात आडगाव येथील गरीब अल्पभुधारक शेतकरी तुकाराम कुलकर्णी यांनी त्यांच्या आजारपणात उपचारासाठी ठेवीची रक्कम मिळावी म्हणून शेकडो चकरा मारल्या परंतु त्यांच्या आजपणाकडे प्रशासकाने गांभीर्याने पाहिले नाही या उलट त्यांच्याशी उद्धटपणा करून पैसे मिळणार नसल्याचे सांगितले या उलट अनेक ठेवीदारांच्या ठेवी परत



देण्यासाठी २०% रकमेची मागणी करुन ठेविदाराची लुट करूनच ठेवी देण्यात आली व अनाधिकृत २०%रक्कम न दिल्याने अनेकांच्या ठेवी नाकारण्यात आल्या, तुकाराम कुलकर्णी यांना सदर गोष्टीचा मानसिक त्रास झाल्याने त्यांना हृदयविकाराचा झटका आला व उपचारासाठी पैसे न मिळाल्याने त्यात त्यांचे निधन झाले त्यानंतर देखिल त्यांच्या कुटुंबियांनी शेकडो चकरा मारुन खाजगी सावकाराकडून घेतलेल्या पैशासाठी ठेवीची मागणी केली परंतु निगरगट्ट प्रशासक सहकार्य करायला तयार नाही.ऐन दिवाळीत त्यांच्या कुटुंबावर शिमगा करायची वेळ आलेली असताना प्रशासक आडमुठी भुमिका घेत आहे, वास्तविक सहाय्यक निबंधक सुरज जगदाळे व सतिश शेरखाने यांची मिलीभगत असुन अनेक ठेवीदारांच्या ठेवी परत देण्यासाठी त्यांनी लाखो रुपये लोकांकडून उकळले

आहेत, अनेक ठेवीदाराकडे त्यांच्या कडुन भ्रष्ट मार्गाने पैसा घेतल्याचे व्हिडिओ देखील आहेत ही बाब गंभीर असून त्यांच्यावर तात्काळ निलंबनाची कार्यवाही करुन त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करण्यासाठी शेतकरी कामगार पक्षाने दि.२२अक्टोबर रोजी दुपारी १०:३० वा.सहाय्यक निबंधक सहकारी संस्थेच्या कार्यालयासमोर शिमगा आंदोलन करण्यात आले यावेळी शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई ॲड.नारायण गोले पाटील यांच्यासह भाई अशोक कुलकर्णी, भाई सतिश शेजुळ, भाई मुंजा पांचाळ , भाई राहुल सोळंके, भाई भास्कर कांबळे, भाई सलीम पठाण, भाई चांगदेव शेजुळ, भाई कौस्तुभ जोशी, भाई लक्ष्मण चव्हाण, भाई विष्णू शेळके, भाई अभिषेक सोळंके, विकास आढाव, राधाकृष्ण पांचाळ, गणेश देशमुख, सचिन शेजुळ अमोल कुलकर्णी, चंद्रकांत खामकर,आदि उपस्थित होते.

# पश्चिम महाराष्ट्रात पुन्हा पावसाचा जोर वाढला, शेतकरी चिंतेत

गेल्या आठ दिवसापासून राज्यात पावसानं उघडीप दिल्याचं चित्र पाहायला मिळत होतं. मात्र, आजपासून पुन्हा एकदा जोरदार पावसाला सुरुवात झाली आहे. आधीच पावसामुळं राज्यातील शेतकरी चिंतेत आहेत. त्यात पुन्हा एकादा पावसाला सुरुवात झाल्यानं शेतकरी हतबल झाले आहेत. आजपासून पश्चिम महाराष्ट्रातील सोलापूर आणि सातारा या दोन जिल्ह्यात जोरदार पावसाला सुरुवात झाली आहे.



सोलापुरात मागील एक तासापासून तुफान पावसाला सुरुवात झाली आहे. ऐन दिवाळीत सोलापुरला मुसळधार पावसाने झोडपले आहे. शहरातील विविध भागात गेल्या तासाभरापासून पाऊस सुरूच आहे. ऐन दिवाळीत पाऊस आल्याने सोलापूरकरांची चांगलीच तारांबळ उडाल्याचं चित्र पाहायला मिळालं. सोलापूरला पावसाचा इशारा दिल्यानंतर आज धुव्वाधार पावसाची हजेरी. जिल्ह्यातील अनेक भागात आज दिवसभर आभाळ दाटून आल्यानंतर रात्रीत पावसाला सुरुवात झाली आहे.

सातारा जिल्ह्याला हवामान खात्यानं येलो अलर्ट जारी केला होता. त्यानुसार आज सातारा जिल्ह्यात अचानक पावसानं धुमाकूळ घातला आहे. कराड शहरासह तालुक्याला जोरदार पावसाने झोडपले आहे. विजेच्या कडकडासह पावसाची गेल्या तीन तासापासून हजेरी लावली आहे. अचानक आलेल्या पावसामुळे नागरिकांची तारांबळ उडाली आहे. दिवसभर उकाड्याने हैराण नागरिकांना मिळाला थंडावा मिळाला आहे. हवामान विभागानं दिलेल्या माहितीनुसार, तापमानात किंचित वाढ होत असून अनेक भागांत ढगाळ वातावरणासह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. कोकण, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा तसेच उत्तर महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांत विजांच्या कडकडाटासह हलक्या पावसाची शक्यता आहे. तर विदर्भात मात्र कोरडे वातावरण राहण्याचा अंदाज आहे. मुंबईत कमाल तापमान ३६ अंश सेल्सिअस आणि किमान २६ अंश सेल्सिअस इतके राहण्याची शक्यता आहे. पावसामुळे शेतीचे झालेले नुकसान विविध पिकांवर झाले आहे, विशेषतः सोयाबीन, मका, ऊस, कांदा, कापूस, मूग, उडीद आणि धान्य यांसारख्या पिकांना फटका बसला आहे. सततच्या पावसामुळे शेतात पाणी साचले आहे, पिके सडली आहेत आणि काढणीला आलेली पिकेही वाया गेली आहेत. यामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे आणि ते मोठ्या संकटात सापडले आहेत. तर काही भागात पूर आल्यामुळं पिकासहीत जमिनी वाहून गेल्या आहेत.

## बागायती गव्हाची पेरणीची वेळ आणि वाण



रब्बी हंगाम सुरु झाला आहे, या काळात गहू पेरणीसाठी शेतकरी तयारी करीत असतात. बागायती गव्हाच्या पिकाचे नियोजन करण्यासाठी जमीन, बियाणे, पेरणी, खत व्यवस्थापन आणि पाणी व्यवस्थापन यांसारख्या गोष्टींवर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. याचबरोबर पेरणी कधीपर्यंत करावी, कोणते वाण निवडावे, याचे नियोजन करण्याची गरज आहे.

पेरणीपुर्वीच तयारी : बागायती गहू पिकाच्या नियोजनासाठी भारी व खाल जमीन निवडून पूर्व मशागत करणे. जमिनीचा उतार लक्षात घेऊन गव्हासाठी २.५ ते ४ मीटर रुंद व ७ ते २५ मीटर लांब आकाराचे सारे पाडावेत. जमिनीतील उपलब्ध ओलाव्यावर कोरडवाहू क्षेत्रातील गव्हाची पेरणी ३१ ऑक्टोबरपर्यंत पूर्ण करावी. संरक्षित पाणी उपलब्ध असल्यास पेरणी २५ ऑक्टोबर ते ५ नोव्हेंबर दरम्यान करावी. संरक्षित पाण्याखालील गव्हासाठी हेक्टरी ७५ ते १०० किलो बियाणे पेरणीसाठी वापरावे.

कोणते वाण निवडावे? कोरडवाहू आणि मर्यादित सिंचनासाठी सुधारित जाती – एन.आय.ए.डब्लू. १४१५ (नेत्रावती). एन.आय.ए.डब्लू. १९९४ (फुले समाधान), एन.आय.ए.डब्लू. ३६२४ (फुले अनुपम), एन.आय.ए.डब्लू. ३१७० (फुले सात्विक), एन.आय.ए.डब्लू. १४१५ (नेत्रावती). बन्सी जात (कोरडवाहू)– एम.ए.सी.एस.४०२८, एन.आय.डी.डब्लू. १९४९, एम.ए.सी.एस.४०५८. तांबेरा प्रतिकारक– ए.के.डी.डब्लू २९९७–१६ (शरद).

बीज प्रक्रिया करण्याची पद्धत : पेरणीपूर्वी बियाण्यास थायरम (७५% डब्लू एस. ३ ग्रॅम प्रति किलो बियाण्यास प्रक्रिया करावी. बियाणे वाळवल्यानंतर प्रति किलो बियाण्यास २५ ग्रॅम अझोटोबॅक्टर आणि २५ ग्रॅम स्फुरद विरघळ विणाऱ्या जीवाणू संवर्धकाची बीजप्रक्रिया करावी. बीजप्रक्रियेमुळे उत्पादनात १० ते १५ टक्के वाढ होते. पेरणीच्या वेळी जमिनीत पुरेशी ओल असावी. पेरणी ५ ते ६ सेंमी खोल करावी, त्यामुळे उगवण चांगली होते. संरक्षित पाण्याखालील गव्हाची पेरणी दोन ओळीत २० सेंमी अंतर ठेवून करावी. पेरणी उभी आडवी अशी दोन्ही बाजूने न करता एकेरी करावी म्हणजे आंतरमशागत करता येते. बियाणे झाकण्यासाठी कुळव उलटा करून चालवावा म्हणजे बी व्यवस्थित दबून झाकले जाते.

## या जातीच्या मुळ्याची लागवड करा, मिळेल भरघोस नफा

सध्या शेतकरी वेगेवेगळ्या पिकांची लागवड करून चांगले उत्पन्न घेत आहेत. कमी खर्चामध्ये शेतकरी जास्त नफा मिळवत आहेत. यासाठी शेतकरी नवनवीन पिकांची लागवड करण्यास प्राधान्य देतात. आपल्याकडे अनेकजण मुळा शेती देखील करतात आणि यामधून चांगला नफा कमावतात. बऱ्याचदा मुळा शेतीती परवड नसल्याचे देखील अनेक शेतकरी म्हणतात. मात्र यामध्ये न परवडण्याचं कारण म्हणजे तुम्ही मुळा लागवड करताना योग्य वाणाची लागवड करत नाहीत. त्यामुळे तुम्हाला यामध्ये परवडत नाही.

योग्य वाणाची निवड महत्वाची : योग्य वाणाची लागवड केली तर यामधून चांगला फायदा मिळतो. कोणत्याही पिकाची लागवड करायची म्हंटल की योग्य वाणाची निवड करणे गरजेचे आहे. तसेच मुळा लागवड करताना देखील योग्य वाणाची लागवड करणे गरजेचे आहे. भारतीय कृषी संशोधनाने मुळ्याच्या अनेक जाती विकसित केल्या आहेत. त्यामध्ये पुसा चेतकी आणि पुसा मृदुला




या जातींची लागवड करून तुम्ही चांगले उत्पादन घेऊ शकता. पुसा चेतकी व पुसा मृदुला या जातींची लागवड कमी वेळात लवकर होते. या जातीच्या मुळ्याची पाने एकसारखी हिरवी व न कापलेली असतात व त्याची पाने भाजीमध्ये वापरतात. या जातीचे उत्पादन ३५ ते ४० पर्यंत मिळते. पुसा चेटकीची मुळं २५ ते ३० सेंमी लांब, खायला खूप चवदार असतात. परिमाणी याला बाजारात देखील मोठी मागणी असते आणि बाजारात मागणी असल्यामुळे याला भाव देखील चांगला मिळतो.

पुसा मृदुला : मुळ्याची पुसा मृदुला ही जात गोलाकार व लाल रंगाची असते. तसेच ही जात फार कमी वेळात तयार होते. त्याच्या तयार होण्याचा कालावधी २८ ते ३२ दिवसांचा असतो. मुळ्याचे मूळ हे कमी असते. मात्र यातून उत्पादन जास्त निघते. याच्या लागवडीसाठी चुनखडी किंवा चिकणमाती माती त्याच्या पेरणीसाठी चांगली मानली जाते. ती मेडवर देखील पेरली जाऊ शकते. याची लागवड करताना ज्या शेतात पाणी साचणार नाही त्या ठिकाणी लागवड करावी.

## रब्बी हंगामात मसुरच्या कमी पाण्यात जास्त उत्पादन देणाऱ्या जाती

मसूर लागवड ही कमी खर्चाची आणि जास्त नफा देणारी शेती मानली जाते. भारतातील प्रत्येक राज्यात मसूर लोकप्रिय आहे. बाजारात तिला मोठी मागणी आहे. जर तुम्हालाही रब्बी हंगामात भरीव नफा मिळवायचा असेल, तर सुधारित मसूर जातींची लागवड करून चांगली कमाई करू शकता. मसूर हे रब्बी पीक आहे, जे शेतकरी ऑक्टोबर–नोव्हेंबरमध्ये घेतात आणि ते मार्च–एप्रिलमध्ये काढणीला येते. मसूर लागवडीचे वैशिष्ट्य म्हणजे ते कमी पाण्यात जास्त उत्पादन देते, ज्यामुळे शेतकऱ्यांचे बरेच कष्ट वाचतात आणि त्यांना कमी खर्चात चांगले उत्पन्न मिळते.

सुधारित मसूर जाती : रब्बी हंगामात मसूर लागवड केल्यास शेतकरी जास्त उत्पादन आणि चांगला नफा मिळवू शकतात, कारण हे पीक पावसावर अवलंबून असते आणि त्याला जास्त पाणी लागत नाही. तसेच कमी काळजी



घ्यावी लागते. या मसूर जातींची लागवड केल्याने लक्षणीय नफा मिळतो: एल ४७१७ (पुसा अर्ली मसूर) – लवकर पिकणारी ही जात ९५ ते १०० दिवसांत तयार होते, प्रति हेक्टर १२.५ ते २० क्विंटल उत्पादन. एल ४७२७, एल ४७२९ – १०० ते १०५ दिवसांत तयार होते, दुष्काळ सहन करणारी ही जात सरासरी २३ ते २५ क्विंटल प्रति हेक्टर उत्पादन देते. पीडएल –१ (पुसा अवंतिका), पीएसएल –१ (पुसा युवराज) – ही रोग–प्रतिरोधक वाण आहेत जी प्रति हेक्टर १९ ते २० क्विंटल उत्पादन देऊ शकतात. शिवाय, जर शेतकऱ्यांनी योग्य सिंचन, जैव खते आणि कीटक नियंत्रणाकडे लक्ष दिले तर उत्पादन आणखी वाढू शकते.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१७७४ : फिलाडेल्फिया येथे अमेरिकेतील पहिली महाद्विपीय काँग्रेस स्थगित झाली होती.
१८५८ : एच. इ. स्मिथ यांनी वाशिंग मशीन चा पेटेंट घेतलं.
१८६३ : जगातील सर्वात जुने फुटबॉल असोसिएशन लंडनमध्ये सुरु झाले.
१९०५ : नॉर्वे स्वीडनपासुन स्वतंत्र झाला.
१९३६ : हूवर धरणांवरील पहिले इलेक्ट्रिक जनरेटर पूर्णपणे सुरु झाले.
१९४७ : जम्मू आणि काश्मीरचे राज्य भारतात विलीन झाले.
१९५८ : पॅन अमेरिकन एअरवेज ची पहिले व्यावसायिक विमानसेवा सुरु झाली.
१९६२ : धी गोवा हिन्दू असोसिएशन निर्मित, वसंत कानेटकर लिखित व मास्टर दत्ताराम दिग्दर्शित 'रायगडाला जेव्हा जाग येते' या नाटकाचा पहिला प्रयोग मुंबई येथील भारतीय विद्याभवन येथे झाला.
१९७६ : त्रिनिदाद व टोबॅगो देशांना लंडन कडून स्वातंत्र्य मिळालं.
१९९४ : जॉर्डन आणि इस्त्राएल यांनी शांतता करारावर सह्या केल्या.
१९९९ : राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेतील संशोधक व्ही. व्ही. रानडे यांना केंद्र सरकारतर्फे 'स्वर्णजयंती फेलोशिप' जाहीर
२००६ : महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण प्रतिबंधक नियम अंमलात.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१२७० : संत नामदेव (मृत्यू: ३ जुलै १३५०)
१८८१ : भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील क्रांतिकारक, कायदेपंडित व राजकीय नेते बीरेंद्रनाथ ससमल यांचा जन्मदिन.
१८८६ : ओडिसा राज्यातील उल्लेखनीय समाजवादी व कवी पंडित गोदाबरीश मिश्रा यांचा जन्मदिन.
१८८८ : प्रसिद्ध बंगाली लेखक व साहित्यक समीक्षक मोहितलाल मजुमदार यांचा जन्मदिन.
१८९० : भारतीय पत्रकार आणि राजकारणी गणेश शंकर विद्यार्थी यांचा जन्म. (मृत्यू: २५ मार्च १९३१)
१८९१ : वैकुंठ मेहता सहकारी चळवळीचे प्रवर्तक (मृत्यू: २७ आक्टोबर १९६४)
१९०० : इझ्रा मीर माहितीपट निर्मितीचे आद्य प्रवर्तक (मृत्यू: ७ मार्च १९९३)
१९१६ : फ्रान्सवाँ मित्राँ फ्रान्सचे २१ वे राष्ट्राध्यक्ष (मृत्यू: ८ जानेवारी १९९६)
१९१९ : मोहम्मद रझा पेहलवी शाह ऑफ इराण (मृत्यू: २७ जुलै १९८०)
१९२४ : पद्मभूषण पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय स्त्रीवादी सामाजिक कार्यकर्ता व गांधीवादी शोभना रानडे यांचा जन्मदिन.
१९३७ : हृदयनाथ मंगेशकर संगीतकार व गायक
१९४७ : हिलरी क्लिंटन अमेरिकेच्या ६७ व्या परराष्ट्रमंत्री
१९५४ : नाट्य आणि चित्रपट अभिनेते लाक्शीकांत बेर्डे यांचा जन्म. (मृत्यू: १६ डिसेंबर २००४)
१९७४ : रवीना टंडन अभिनेत्री

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९०९ : इटो हिरोबुमी जपानचे पहिले पंतप्रधान (जन्म: १६ आक्टोबर १८४१)
१९३० : डॉ. वाल्डेमर हाफकिन प्लेग व कॉलरा प्रतिबंधक लशीचा शोध लावणारे सूक्ष्मजीवशास्त्रज्ञ (जन्म: १५ मार्च १८६०)
१९४७ : ब्रिटीश कालीन भारतातील बंगाल प्रांताचे गव्हर्नर लॉर्ड लिटन द्वितीय यांचे निधन.
१९५५ : हिंदुस्थानी शास्त्रीय गायक पंडित दत्तात्रेय विष्णू पलुस्कर यांचे निधन.
१९७९ : चंदूलाल नगीनदास वकील अर्थशास्त्रज्ञ, देशातील पहिल्या अर्थशास्त्र विभागाची त्यांनी मुंबई विद्यापीठात सुरुवात केली. (जन्म:)
१९८१ : भारतीय पद्मश्री व ज्ञानपीठ पुरस्कार सन्मानित प्रख्यात भारतीय कन्नड भाषिक कवी दत्तात्रेय रामचंद्र बेंद्रे यांचे निधन.
१९९१ : अनंत काशिनाथ भालेराव स्वातंत्र्यसैनिक, लेखक, दैनिक 'मराठवाडा' चे संपादक, हैदराबाद मुक्तीसंग्राम व संयुक्त महाराष्ट्र चळवळीत सहभाग (जन्म: १४ नोव्हेंबर १९१९)
२००० : भारतीय स्वतंत्रता संग्रामातील प्रमुख क्रांतिकारक व सिद्धहस्त लेखक तसचं, हिंदी, इंग्रजी व बांग्ला बाषिक आत्मकथाकारसाहित्यिक मन्मथनाथ गुप्ता यांचे निधन.

## यंदा रब्बीत गहू, हरभरा सोबत करा राजगिरा लागवड, मिळतील चांगले पैसे

राजगिरा द्विदल वर्गीय आणि जलद गतीने वाढणारे पीक आहे. पिकाची महाराष्ट्रामध्ये सर्वत्र लागवड केली जाते. या पिकाचे मूळस्थान पूर्व व पश्चिम आशिया व आफ्रिका आहे. अहमदनगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यात ,सोलापूर जिल्ह्यातील बार्शी तालुक्यांत आणि बीड जिल्ह्यामध्ये याची पुष्कळ लागवड करतात. माठ, तांदूळ आणि राजगिरा वनस्पती एकाच वर्गात मोडतात. राजगिरा धान्याचा रंग वेगवेगळ्या जातीनुसार काळा, सोनेरी पिवळा किंवा पिवळसर पांढरा असतो. राजगिरा हरभरा आणि गव्हामध्ये मिश्रपीक म्हणून घेतले जाते. रब्बी हंगामात सलग पीक म्हणून लागवड केल्यास अधिक उत्पादन मिळू शकते.

राजगिरा पिकाचे महत्त्व : राजगिरा ही अत्यंत बहुपयोगी व पौष्टिक वनस्पती असून जागतिक पातळीवर या पिकास उत्कृष्ट अन्न म्हणून घोषित केलेले आहे.शरीरासाठी अत्यंत गुणकारी असल्याने 'सुपर फुड' म्हणून प्रचलित आहे. राजगिरा ग्लुटेन फ्री, फायबरने युक्त आहे. त्यामुळे वजन कमी करण्यास उपयुक्त, हाडाच्या मजबुतीसाठी वापर, विटॅमिन सी भरपूर मात्रेत असल्याने त्वचा, केस व हिरड्यांच्या विकारांवर उपयुक्त आहे. स्तनदा मातांसाठी दुग्धवाढी करिता उपयुक्त ठरतो. राजगिऱ्यामधील रक्तस्तंभक गुणधर्म रक्तस्त्राव थांबवण्यास मदत करतो. या धान्यामध्ये १४ ते १६ टक्के प्रथिने, कॅल्शियम, फॉस्फरस व लोह खनिजांचे इतर तृणधान्यांच्या तुलनेत अधिक प्रमाण असते. लायसीन अमिनो आम्लाची आणि लिनोलिक या फॅटी ॲसिडची मात्रा इतर तृणधान्याच्या तुलनेत जास्त असते. पौष्टिक गुणधर्मामुळे या पिकाच्या दाण्यास विविध प्रकिया उद्योगामध्ये वाढती मागणी आहे. राजगिरा पासून लाडू व गुडदाणी बनवितात.

जमीन : सामू साधारणपणे ६.५ ते ७.५ असावा. अगदीच हलकी. पाणथळ, चोपण व क्षारयुक्त जमीन लागवडीसाठी निवडू नये. जमिनीमध्ये लागवडीपूर्वी जमिनीची खोल नांगरट करून ढेकळे फोडून भुसभुशीत करून एकरी २ ते ३ टन कुजलेले शेणखत मिसळावे. या पिकाच्या वाढीसाठी थंड व



कोरडे हवामान उत्तम राहते. सरासरी १० ते ३० अंश सेल्सिअस तापमान असल्यास या पिकाची चांगली वाढ होते.

पेरणीचा कालावधी : पेरणी साधारण १५ ऑक्टोबर ते १५ नोव्हेंबर दरम्यान करावी. लागवड करताना बियाणे १ ते २ सेंमी पेक्षा जास्त खोल जाणार नाही याची काळजी घ्यावी. त्यामुळे उगवण योग्य वेळेत आणि चांगली होऊन प्रति एकरी आवश्यक रोपांची संख्या मिळते. लागवड करताना दोन झाडांमधील अंतर १५ सेंमी व दोन ओळीमधील अंतर ४५ सेंमी ठेवावे.

बियाणे मात्रा व जाती : प्रति हेक्टरी दीड ते दोन किलो बियाणे. सुधारित जाती : अन्नपूर्णा, जी. ए १, सुवर्णा, फुले कार्तिकी या सुधारित जाती आहेत. फुले कार्तिकी जात महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथे विकसित केलेली असून ११० ते १२० दिवसांमध्ये ही जात काढणीसाठी तयार होते. ही जात ५ ते ७ फूट वाढते, पाने हिरव्या रंगाची असतात. कणीस लांबट व पिवळ्या रंगाचे असून, लांबी ४० ते ६० सेंमीपर्यंत आहे. पीक पक्व झाल्यानंतर कणसांची कापणी करावी. कापणीस उशीर झाल्यास दाणे झडतात व उत्पादनात घट होते. सुधारित तंत्राचा अवलंब केल्यास प्रति एकरी ५ ते ६ क्विंटल उत्पादन मिळते.

पेरणी करण्याची पद्धत : बियाणे बारीक असल्याने वाळलेली माती मिसळून दीड फुटी पाभरीने (४५ १५ सें.मी. अंतरावर) एक ते दीड सें.मी. खोलीपर्यंत पेरणी करावी. आंतर मशागत: पेरणीनंतर सारे पाडून लगेच हलके पाणी द्यावे. आठ दिवसांच्या आत पिकाची विरळणी करणे अत्यंत गरजेचे आहे, त्यामुळे पिकाची वाढ व्यवस्थित होते आणि रोपांतील योग्य अंतर राखले जाते. पेरणीनंतर २० ते २५ दिवसांनी लहान रोपांची विरळणी करावी. एक ते दोन वेळा खुरपणी, तसेच कोळपणी करून जमीन मोकळी व भुसभुशीत करावी. कोळपणी नंतर झाडाच्या बुंध्याजवळील मातीच्या भरीमुळे पीक पक्व झाल्यावर पडत नाही. पेरणी नंतर ११० ते १२० दिवसांमध्ये हे पिक काढणीस येते.

खत व्यवस्थापन : माती परीक्षणानुसार हेक्टरी ६० किलो नत्र व ४० किलो स्फुरद तसेच २० किलो पालाश रासायनिक खतांची मात्रा द्यावी. योग्य वेळी देण्यात आलेल्या खतांमुळे पिकाची जलद वाढ होऊन पानांच्या आकार वाढीसाठी फायदा होतो.पीक कालावधी सुमारे साडेतीन ते चार महिने असतो.भाजी विक्रीतून उत्पन्न : राजगिऱ्याची उगवण दाट होते. त्यामुळे दाण्यांच्या चांगल्या उत्पादनासाठी उगवणीनंतर तीन आठवड्यांनी विरळणी करावी लागते. या विरळणी केलेल्या रोपाची भाजी करण्यासाठी वापर होतो. एकरभरातील भाजी विक्रीतून सुमारे सहा हजार रुपयांचे अतिरिक्त उत्पन्न मिळते.

उत्पादन : सुधारित तंत्राचा वापर केल्यास प्रति हेक्टरी १४ ते १६ क्विंटल उत्पादन मिळते. जातीनिहाय उत्पादनामध्ये फरक पडत असल्याने अधिक उत्पादन देणाऱ्या जातींची लागवडीसाठी शेतकऱ्यांनी निवड करावी. महात्मा फुले कृषी विद्यापीठाने राजगिरा पिकाची अधिक उत्पादन देणारी फुले कार्तिकी हा वाण लागवडीसाठी प्रसारीत केलेला आहे.

उत्पन्न : राजगिरा पिकास साधारणपणे रुपये ५० ते ७० प्रति किलो याप्रमाणे बाजारभाव मिळतो. त्यानुसार हेक्टरी एक लाख २५ हजार पर्यंत आर्थिक उत्पन्न मिळते. या पिकावरील पूर्व मशागत, बियाणे, पेरणी, खते, खुरपणी ,काढणी, मळणी व इतर कामे याबाबतचा खर्च वजा जाता या पिकापासून साधारणपणे एकूण मिळणाऱ्या आर्थिक उत्पन्नाच्या ६० टक्के नफा मिळतो.




राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत
शनिवार दि.२५ ऑक्टोबर २०२५






# जिल्ह्यातील जनतेने दानवे परिवाराला भरघोस प्रेम दिले -भास्कर दानवे

जालना। प्रतिनिधी

जालना जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी जिल्ह्यातील सर्व राजकीय पक्षाने आपसातील राजकीय मतभेद विसरून एकत्रित येऊन विकास साध्य करण्याचे आवाहन माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे यांनी जालना येथे जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या दीपावली स्नेह मिलन कार्यक्रमात केले.जालना शहरात सामाजिक ऐक्य व आत्मीयतेचे प्रतीक ठरणारा दीपावली स्नेहमिलन सोहळा माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे व जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांच्या वतीने आयोजित करण्यात आला होता, हा कार्यक्रम आज शुक्रवार, दिनांक २४ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी १०.०० ते दुपारी १.०० या वेळेत भारती लॉन्स, बालाजी चौक, भोकरदन रोड, जालना येथे संपन्न झाला.



यावेळी , माजी मंत्री आ.अर्जुनराव खोतकर, आ.नारायण कुचे, कैलास गोरंटयाल माजी आमदार अरविंद चव्हाण, माजी आमदार संतोष सांबरे, माजी आ. राजेश टोपे भाजपा प्रदेश सचिव राहुल लोणीकर, सतीश घाटगे, उद्योजक घनश्याम गोयल, अशोक पांगारकर, राजेश राऊत, रामेश्वर भांदरगे, , विमलताई आगलावे, सुधाकरराव दानवे, अक्षय गोरंटयाल, अर्जुन गेही, बाबासाहेब इंगळे, धनराज काबलीये, नगरसेवक सतीश जाधव, जिवन सले, शशिकांत घुगे, ज्ञानेश्वर ढोबळे, महेश निकम, सुनील राठी, रवी अग्रवाल उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी, गोवर्धन अग्रवाल, मधुकरराव दानवे, अमोल कारंजेकर, वसंत शिंदे, सुनील पवार, सोपान पेंढारकर, वसंत जगताप, सुभाष बोडखे, मा.जिल्हा सरचिटणीस देविदास देशमुख, बाबासाहेब कोलते, संजय आटोळे, भगवान मात्रे, गजानन नागवे, संजय डोंगरे, सिद्धिविनायक मुळे आदींची उपस्थिती होती. यावेळी दीपावली स्नेह मिलन कार्यक्रम प्रसंगी शुभेच्छा देताना माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे म्हणाले की, मी १९९० ला पहिल्यांदा एकमेव कॉंग्रेस च्या राजवटीत भाजपचा आमदार झालो तेंव्हा पासून मी जालना जिल्ह्याच्या विकास कामासाठी व अनुशेष भरून काढण्यासाठी तत्कालीन सरकारच्या विरोधात आंदोलन केले त्या नंतर १९९५ ला भाजपा युती ची सत्ता असताना जिल्ह्याच्या विकासासाठी अनेक कामे मंजूर केली व २०१४ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार मध्ये मी मंत्री व भाजपाचा प्रदेशाध्यक्ष असल्यामुळे केंद्र व राज्यशासनाच्या अनेक जनकल्याणकारी योजनेंचा फायदा जालना जिल्ह्यासाठी मिळवून दिला. त्यांनी पुढे बोलताना सर्व जालनावासियांना दीपावली व पाडव्याच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या. आपल्या सर्वांच्या आयुष्यात सुख, समृद्धी, आरोग्य आणि आनंद कायम नांदो असे मनोगत त्यांनी व्यक्त केले. जालना जिल्ह्याचे माजी केंद्रीय राज्यमंत्री आणि ज्येष्ठ नेते श्री. रावसाहेब पाटील दानवे यांच्या पराभवामुळे जिल्ह्याच्या विकासाचे मोठे नुकसान झाले असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली आहे. त्यांनी म्हटले की, ''रावसाहेब दानवे यांनी मंत्रीपदाच्या काळात जिल्ह्यासाठी अनेक विकासकामे केली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली विविध प्रकल्पांना गती मिळाली होती. त्यांच्या पराभवामुळे केंद्रातील प्रतिनिधित्व कमी झाले असून, त्याचा थेट परिणाम जिल्ह्याच्या विकासावर झाला आहे, यापुढील कोणत्याही निवडणुकीत भाजपाचा पराभव होणार नसून विजय होणार आहे व जालना जिल्हा भाजपाचा बालेकिल्ला असल्याचे असे त्यांनी सांगितले. यावेळी भास्कर आबा दानवे म्हणाले की, जालना जिल्ह्यातील जनतेने नेहमीच दानवे परिवारावर अपार प्रेम आणि विश्वास दाखवला आहे, असे मत भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी व्यक्त केले.ते म्हणाले की, ''दानवे परिवाराने गेल्या अनेक वर्षापासून जनतेची सेवा प्रामाणिकपणे केली आहे. निवडणुकीतील निकाल काहीही असला, तरी जनतेचे प्रेम आणि पाठिंबा आमच्यासाठी सर्वांत मोठा बळ आहे. आम्ही हे प्रेम अधिक दृढ करण्यासाठी आणि जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने कार्य करत राहू. यावेळी माजी मंत्री आ.अर्जुनराव खोतकर व भाजपा जिल्हाध्यक्ष आ.नारायण कुचे यांनीही उपस्थित नागरिकांना व दानवे परिवाराला शुभेच्छा दिल्या. यावेळी जालना जिल्ह्यातील व शहरातील व्यापारी, डॉक्टर, वकील सर्व राजकीय पक्षाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## माजी आ. राजेश टोपे यांना पालिकेसाठी उमेदवार मिळेना




अंबड । प्रतिनिधी

अंबड नगर परिषद निवडणूक जाहीर झाली असून, यासाठी भाजप पक्षांमध्ये सगळ्यात जास्त उमेदवार नगरसेवकासाठी तसेच नगराध्यक्षासाठी मागणी करीत आहेत परंतु माजी आमदार राजेश टोपे यांचा बालेकिल्ला असलेल्या अंबडमध्ये राष्ट्रवादी शरद पवार गटाला उमेदवार मिळत नसल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे.

माजी आमदार राजेश टोपे या नावाची जालना जिल्ह्यात नाही तर महाराष्ट्रामध्ये त्यांची ओळख आहे. परंतु ही परिस्थिती आता का आली आहे याचे अंतचिंतन करणे गरजेचे आहे. याला कोण जबाबदार आहे याचा अभ्यास श्री राजेश टोपे यांनी करणे गरजेचे आहे, असे बोलले जात आहे. राजकारण खिलाडी स्वर्गीय अंकुशराव टोपे यांचा अभ्यास चांगला होता परंतु आता राजेश टोपे यांनी तसा अभ्यास करणे गरजेचे आहे. अंबड शहरांमध्ये पंधरा दिवसानंतर नळाला पाणी येत आहे, याबाबत राजेश टोपे काहीच बोलायला तयार नाहीत. ज्यांना जवळ केले तेच पुढारी राजेश टोपेला सोडून गेले, त्याचा पण अभ्यास करणे गरजेचे आहे. राजेश टोपे यांनी राजकारण करू नये, त्यांनी फक्त संस्था संभाळावी अशी चर्चा होत आहे. राजकारण करायचे असलं तर शिस्तीचे पालन करणे गरजेचे आहे. राजेश टोपे यांच्या जवळच्या कर्मचाऱ्याकडून त्यांना धोका निर्माण होत असल्याचे बोलल्या जात आहे. टोपे यांनी तालुक्यामध्ये नाहीतर जिल्ह्यामध्ये फार मोठ्या योजना आणल्या आहेत हे पण विसरता कामा नये. समर्थ सहकारी बँक, समर्थ सहकारी कारखाना, सागर सहकारी साखर कारखाना, मत्सोदरी संस्था, सूतगिरणी, दूध संघ या सर्व संस्था स्वर्गीय अंकुशराव टोपे यांनी स्थापन केल्या आहेत. त्यांना खोटं नाटक अजिबात जमत नव्हतं. परंतु आता राजेश टोपे यांचे लक्ष नसल्यामुळे राजेश टोपे यांना संपवायचं असे कामकाज असल्याचे दिसून येत आहे. शेवटी या प्रकरणी समर्थ साखर कारखाना सागर साखर कारखाना समर्थ बँक या कर्मचाऱ्याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. अशी चर्चा ऐकायला येत आहे.

## अतिवृष्टी, महापूरातून सावरत नाही तोच पैठण तालुक्यात पुन्हा पावसाचे थैमान

संभाजीनगर । प्रतिनिधी

मागील आठवड्यातील अतिवृष्टी आणि चुकीच्या पाणी विसर्गामुळे झालेल्या नुकसानीतून पैठण तालुका सावरत असतानाच, ऐन दिवाळीच्या दिवशी पुन्हा वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस झाला. या नवीन पावसामुळे पूर आणि नुकसानीने त्रस्त झालेल्या अनेक गावांमध्ये नागरिकांवर अंधारातच दिवाळीची पूजा करण्याची वेळ आली आहे. नैसर्गिक संकटांच्या या मालिकेमुळे अनुदान मदतीची वाट पाहणाऱ्या नुकसानग्रस्तांचे दुःख वाढले आहे, ज्यामुळे पैठणकरांची दिवाळी कठीण झाली.

मागील आठवड्यात अतिवृष्टी आणि नाथसागर धरणातून पाटबंधारे विभागाच्या चुकीच्या विसर्ग नियोजनामुळे आलेल्या महापुराने पैठण तालुक्याला मोठा फटका बसला. हजारो शेतकऱ्यांचे शेतीतील उभे पीक व फळबागा खरडून गेल्या, तर गोदावरी नदीला सोडलेल्या चार लाखांहून अधिक पाण्याच्या विसर्गामुळे पैठण शहरातील सखल भागातील गरीब नागरिक व मजुरांचे संसार उद्ध्वस्त झाले. अनेक घरांची मोठ्या प्रमाणावर पडझड झाली. या नुकसानीमुळे त्रस्त असलेल्या पैठणकरांना राज्य शासनाने दिवाळीपूर्वी अनुदान मदत देण्याची घोषणा केली होती. मात्र, हे नुकसानभरपाईचे अनुदान मिळण्याआधीच पुन्हा एकदा निसर्गाने संकट उभे केले. तालुक्यात वादळी वाऱ्यासह विविध गावांमध्ये जोरदार पाऊस झाला. या अचानक आलेल्या पावसामुळे पैठण, पिंपळवाडी, बालानगर, रहाटगाव, ढाकेफळ, कातपूर, राहुलनगर, आपेगाव, वडवाळी, पाटेगाव, ७४ जळगाव, दक्षिण जायकवाडी यासह अनेक गावांमध्ये नागरिकांची तारांबळ उडाली. ऐन दिवाळीच्या सणाच्या दिवशी पाऊस आणि वादळामुळे अनेक गावांमध्ये अंधारातच दीपावलीचे पूजन करण्याची दुर्दैवी वेळ नुकसानग्रस्त नागरिकांवर आली आहे. नैसर्गिक संकटांच्या मालिकेमुळे पैठण तालुका पूर्णपणे मेटाकुटीला आला आहे.

## बंजारा समाजाच्या उपोषणाला माजी आ. अरविंदरा चव्हाण यांची भेट



जालना । प्रतिनिधी

जालना येथे सुरू असलेल्या बंजारा समाजाचे नेते विजय राठोड यांचा सात दिवसांचा अमर उपोषणाला राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे जालना जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार अरविंद चव्हाण यांनी भेट घेतली.

या उपोषणाला राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचा पाठींबा आहे, असे ते म्हणाले. तसेच बंजारा समाज माझ्या पाठीशी सदैव आहे, त्यामुळे बंजारा समाजाच्या पाठीशी राहणे हे माझे कर्तव्य आहे. यावेळी उपोषण स्थळी उमेश मोहिते, समाधान राठोड, राहुल राठोड, लक्ष्मण राठोड, युवराज राठोड, राजेश पवार बादल राठोड व बंजारा समाज मोठ्या प्रमाणात उपस्थित होता.

## बँकेची बातमी लावल्यामुळे मॅनेजर जेठेला लागली मिरची

जालना । प्रतिनिधी

दि चिखली अर्बन को बँक लिमिटेड या बँकेची बातमी प्रसिद्ध केल्यामुळे अंबड चिखली बँकेचे मॅनेजर विनोद जेठेला मिरची लागली. जुने असलेले मॅनेजर त्यांचा मोबाईल क्रमांक नंबर वापर करून सध्या असलेले मॅनेजर हे दिशाभूल करीत आहेत. या शाखेमध्ये मॅनेजर यांच्याकडून नियमाचे पालन होत नसल्याचे दिसून येत आहे. याप्रकरणी जिल्हा उपनिबंधक यांनी चौकशी करणे गरजेचे आहे.

या बँकेअंतर्गत एकूण ३१ शाखा आहेत, परंतु जालना शाखा, अंबड शाखा, जालना नवीन मोंढा शाखा या शाखेंतर्गत फोन पे, गुगल पे बंद आहे तर एटीएम मशीन नवीन घेतल्यापासून कायमस्वरूपी बंद आहे . या सुविधा बंद असल्यामुळे खातेदारांना सुविधा मिळत नाही. तसेच खातेदारांनी बँकेत गेल्याशिवाय व्यवहार करता येत नाही तसेच एटीएम मशीन नवीन आल्यापासून बंदच असल्याचे दिसून येत आहे परंतु या विषयावर बँकेचे जबाबदार अधिकारी कोणीही बोलायला तयार नाही याचं कारण काय आहे हे मात्र अजून समजू शकले नाही या बँकेअंतर्गत मोबाईल बँकिंगचे अंतर्गत वेळेची बचत होण्यासाठी फायदा असतो असे पण एक चिखली बँकेच्या कॅलेंडर माध्यमातून कळविण्यात आलेले आहे.

तसेच या बँकेचे अंतर्गत शाखेतील मोबाईल बँकिंग साठी सर्व शाखेवर ग्राहकांना विशेष प्रशिक्षणाची व्यवस्थापन करण्यात आली आहे असे पण दिशाभूल करण्यासारखे प्रसिद्धी चिखली बँकेकडून करण्यात येत आहे सदरील चिखली बँक अंतर्गत मोठ्या प्रमाणात पैशाची उधळपट्टी करून एटीएम मशीन खरेदी करण्यात आली आहे परंतु त्याचा फायदा अद्याप पर्यंत एकही खातेदाराला झाला नाही असे पण परिस्थिती समोर आली आहे. तसेच बंपर लोन धमाका अशी पण लालूच या बँकेमार्फत देण्यात येत आहे. दीपावलीच्या सणावर या चिखली बँकेची सुविधा ना मिळाल्यामुळे खातेदारांमध्ये नाराजी पसरले आहे.

## अजित पवार गटाकडून निवडणुकांसाठी जोरदार तयारी

जालना । प्रतिनिधी

आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि नगर परिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी (अजितदादा गट) जालना जिल्हा स्तरावर जोरदार तयारीला लागली आहे. जिल्हाध्यक्ष माजी आमदार अरविंदराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली जिल्ह्यातील विविध तालुक्यांमध्ये पक्ष कार्यकर्त्यांच्या बैठका आणि इच्छुक उमेदवारांशी सविस्तर चर्चा सुरू आहे.

राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार आणि प्रदेशाध्यक्ष खा. सुनिल तटकरे यांच्या विकासाभिमुख नेतृत्वाखाली राष्ट्रवादी कॉंग्रेस कार्यकर्ते आगामी निवडणुकांमध्ये शिव, शाहू, फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची शिदोरी घेऊन मैदानात उतरण्यास सज्ज असल्याचे चित्र दिसत आहे. जालना जिल्ह्यातील सर्व आठ तालुक्यांत निवडणूक आढावा बैठकांना मोठा प्रतिसाद मिळत असून, पक्षाचे वरिष्ठ नेते आणि पदाधिकारी माजी आमदार सुरेशकुमार जेथलिया, शिवाजीराव चौथे, प्रदेश उपाध्यक्ष मधुकरराव आर्दड, रविंद्र तौर, चंद्रकांत कारके, शाह आलमखान, शेख महेमूद, अण्णासाहेब चित्तेकर, बळीराम कडपे, मिर्झा अन्वर बेग, जयमंगल जाधव, लक्ष्मण दळवी, मंगलताई पाटील, ज्ञानेश्वर सरकटे आदींचा जिल्हाभर दौरा सुरू आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हाध्यक्ष माजी आमदार अरविंदराव चव्हाण यांनी जिल्ह्यातील जि.प., पं.स. आणि नगर परिषद निवडणुकांसाठी इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागविण्याची प्रक्रिया औपचारिकरीत्या सुरू केली आहे. यानंतर पक्षाची जिल्हा कार्यकारिणीची बैठक आयोजित करण्यात येणार असून, त्यामध्ये प्राप्त झालेल्या अर्जांचा आढावा घेत इच्छुक उमेदवारांच्या मुलाखतीचा कार्यक्रम लवकरच जाहीर केला जाणार असल्याची माहिती पक्षाच्यावतीने देण्यात आली आहे.

## दीपोत्सवाच्या प्रकाशात भक्तिरसाने न्हाऊन निघाले श्रीक्षेत्र कपिलधार

बीड/ प्रतिनिधी

बलिप्रतिपदा पाडव्याच्या शुभमुहूर्तावर श्रीक्षेत्र कपिलधार येथील श्री संत शिरोमणी मन्मथ स्वामी यांच्या संजीवन समाधीस्थळी अत्यंत भक्तिभावाने महा रुद्राभिषेक व सेज पूजेचा दिव्य सोहळा पार पडला. दीपावलीच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण मंदिर परिसर सुवासिक फुलांच्या आरासीत सजवण्यात आला होता, तर हजारो दिव्यांच्या प्रकाशाने संपूर्ण परिसर उजळून निघाला होता. या पवित्र दिवशी सकाळी लवकर मंत्रोच्चार, वेदमंत्र आणि पुरोहितांच्या सान्निध्यात रुद्राभिषेक विधी पार पडला. त्यानंतर सेज पूजा व



दीपोत्सव कार्यक्रम पार पडला. भक्तांच्या जयघोषाने आणि ''मन्मथ स्वामींच्या जयघोषाने'' वातावरण भारावून गेले होते.

या मंगल सोहळ्यास मोठ्या संख्येने भाविकांनी उपस्थित राहून दर्शनाचा लाभ घेतला. विशेषतः या पूजेसाठी बालाघाटचे युवा उद्योजक अशोक (दादा) रसाळ, पंडित रसाळ सहपरिवार, तसेच दत्त संस्थानचे मठाधिपती श्री वैजिनाथ महाराज शिंदे, मन्मथ स्वामी देवस्थानचे पूजा पुरोहित श्री विश्वनाथ स्वामी महाराज, डॉ. त्रिंबक नागनाथ स्वामी कपिलधार,आणि दै. लोकमंथनचे जिल्हा प्रतिनिधी व महाराष्ट्र राज्य पत्रकार संघटना मुंबई, बीड जिल्हा सहसचिव अमोल शिंदे सहपरिवार यांनी उपस्थित राहून श्री संत शिरोमणी मन्मथ स्वामींचे दर्शन घेतले व मनोभावे पूजा केली. मंदिराची फुलांनी सजवलेली आरास आणि दिव्यांची लखलखीत रोषणाई पाहण्यासाठी दूरदूरवरून भाविकांनी कपिलधार गाठले. संध्याकाळी आरती व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. भक्तांनी दीपोत्सवाचा आनंद घेत 'जय मन्मथ स्वामी' च्या जयघोषात संपूर्ण कपिलधार भक्तिरसात न्हाऊन निघाले. या निमित्ताने कपिलधार क्षेत्रात उत्सवी आणि पवित्र वातावरण निर्माण झाले होते. भाविकांच्या श्रद्धा, भक्ती आणि आनंदाने भरलेला हा दिव्य सोहळा सर्वांच्या मनात कायमचा कोरला गेला.

# साहित्य क्षेत्र कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानापासून अबाधित राहील. - माजी कुलगुरु डॉ. निमसे

अहिल्यानगर । प्रतिनिधी

साहित्य क्षेत्रावर कृत्रिम बुद्धिमत्ता या तंत्रज्ञानाचा कुठलाही परिणाम होणार नाही कारण साहित्य हे क्षेत्र वेगळ्या पद्धतीने तयार होते. समाजात घडणाऱ्या विविध घटनांचा अभ्यास करूनच किंवा त्यांचा मागवा घेऊनच नवनवीन साहित्याची निर्मिती होत असते. त्यामुळे साहित्य हे क्षेत्र कृत्रिम बुद्धिमत्ता या तंत्रज्ञानापासून सतत अबाधित राहील असा ठाम विश्वास माजी कुलगुरू डॉ. सर्जेराव निमसे यांनी व्यक्त केला.



महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे सावेडी उपनगर शाखा व शांतीकुमार फिरोदिया मेमोरियल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित वारसा या ११ व्या दिवाळी अंकाच्या प्रकाशन डॉ. निमसे यांच्या शुभहस्ते करण्यात आले त्याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. महाराष्ट्र साहित्य परिषद सावेडी उपनगर शाखेचे अध्यक्ष तथा प्रसिद्ध उद्योजक नरेंद्र फिरोदिया यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या दिवाळी अंकाच्या शानदार प्रकाशन समारंभास प्रसिद्ध साहित्यिक व समीक्षक प्रा. डॉ. सुधाकर शेलार, ज्येष्ठ लेखिका प्रा. मेधाताई काळे, ज्येष्ठ पत्रकार सतीश डेरेकर आदी मान्यवर यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी बोलताना कुलगुरू डॉ. सर्जेराव निमसे म्हणाले की, साहित्य व संगीत हे समाजाचे सत्व दाखवते. समाजाचा विकसितपणा व संस्कृतपणा दाखविते. साहित्याशी गणिताचा निकटचा संबंध आहे, असे सांगून मी सोसायटी हायस्कूलमध्ये माध्यमिक शिक्षण घेतले. आमच्या काळात साहित्यप्रभा होती. खेड्यातील सर्व मुले आम्ही एकत्र राहिलो. आम्ही त्या काळात केशवसुत, बा.सी. मर्ढेकर यांचे साहित्य वाचले होते. जीवनासाठी कला हा सिद्धांत आम्हाला मान्य होता. ज्या देशाची संस्कृती विकसित झाली. त्या देशाचे गणितही खूप विकसित झालेले होते असे ते म्हणाले. ज्येष्ठ समीक्षक डॉ. सुधाकर शेलार म्हणाले की, अहिल्यानगर शहरामध्ये साहित्यिक सांस्कृतिक वातावरण कायम टिकून राहण्यामागे महाराष्ट्र साहित्य परिषदेसारख्या शाखांचे मोठे योगदान आहे.

महाराष्ट्राला दिवाळी अंकाची मोठी परंपरा आहे. मसापच्या सावेडी उपनगर शाखेने गेल्या ११ वर्षापासून दिवाळी अंकाची ही परंपरा जपली आहे. वारसासारख्या दिवाळी अंकाची निर्मिती करीत असतानाच लेखक, वाचक, प्रकाशक व समीक्षक या सगळ्यांची मोट बांधून साहित्यिक चर्चा घडवून आणण्याचे व समाजाला दिशा देण्याचे काम मसापच्या माध्यमातून होते.

या शहराचा साहित्यिक आणि सांस्कृतिक पाया भक्कम करण्यासाठी साहित्य व कला रसिक असणाऱ्या उद्योजक नरेंद्र फिरोदिया यांचा मोलाचा वाटा आहे.

महाराष्ट्रात १९ व्या शतकापासून दिवाळी अंकाची परंपरा सुरू झाली. सुरुवातीच्या काळामध्ये नवीन विचार आणि प्रबोधन करण्याचे काम दिवाळी अंकाच्या माध्यमातून झाले, तर २१ व्या शतकाच्या उत्तरार्धात दिवाळी अंक म्हणजे मनोरंजन असे समीकरण झाले. सुरुवातीच्या काळामध्ये ज्ञानप्रकाश आणि केसरी सारख्या दिवाळी अंकांनी चांगली पायाभरणी केली. त्यांना चांगली लोकप्रियता देखील मिळाली. परंतु अलीकडच्या काळामध्ये वांग्मयीन वाद विवादाची परंपरा कालबाह्य होते की काय अशी परिस्थिती निर्माण झाली होती. अंतर्नाद सारखा दिवाळी अंक असेल किंवा र. धो. कर्वे यांनी सुरू केलेल्या समाज स्वास्थ्य सारख्या नियतकालिकांनी समाज मनाच्या जडणघडणीत मोलाचे योगदान दिले. समाज माध्यमांच्या जाळ्यात गुरफटलेल्या पिढीला वाचन संस्कृतीचे संस्कार करण्यासाठी वारसासारखे दिवाळी अंक उपयुक्त ठरतील अशी आशा व्यक्त करून वारसा दिवाळी अंक इथून पुढे देखील अव्यहातपणे चालू राहावा अशी अपेक्षा त्यांनी यावेळी व्यक्त केली. यावेळी नरेंद्र फिरोदिया यांनीही आपले विचार मांडले. वारसा या दिवाळी अंकात योगदान देणाऱ्या मान्यवरांचा सन्मानचिन्ह शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. वारसा दिवाळी अंकाचे कार्यकारी संपादक व सावेडी उपनगर शाखेचे प्रमुख कार्यवाह जयंत येलुलकर यांनी प्रास्ताविक केले. प्रसाद बेडेकर यांनी सूत्रसंचालन केले. या कार्यक्रमास प्रसिद्ध गायक पवन नाईक, कथाकथनकार बाळासाहेब देशमुख, जालिंदर बोरुडे, लोककला अभ्यासक भगवान राऊत, नंदा मांडगे, सुरेश चव्हाण, नंदकिशोर आढाव, विजय पिंपरकर, हनीफ शेख, चित्रकार प्राची ठिगळे, वसुधा देशपांडे, रुपेश चैनपुर, श्रीकृष्ण बारटक्के, ज्ञानेश देशपांडे, राजेंद्र सांगळे, प्रशांत अंतपेल्लू, राजेंद्र जासूद, भारती जासूद, महावीर गोसावी आदी विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

# जातीयवादाला बळी न पडता निवडणुकीला सामोरे जाऊ- आ.संदीप क्षीरसागर

## आपल्याकडे आ.क्षीरसागर आश्वासक चेहरा-सलीम भाई; स्व.देशमुख हत्या प्रकरणात आ.क्षीरसागरांची भुमीक महत्त्वाची-राजेंद्र मस्के

बीड । प्रतिनिधी

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक अनुषंगाने बीड व शिरूर तालुक्यातील जिल्हा परिषद, पंचायत समिती गटातील कार्यकर्त्यांची महत्त्वपूर्ण बैठक राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने बोलावली होती. या बैठकीला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. आ. संदीप क्षीरसागर व जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्या प्रमुख उपस्थितीत राष्ट्रवादी भवन बीड येथे झालेल्या बैठकीला कार्यकर्त्यांनी प्रचंड गर्दी केली होती. जागे अभावी निम्म्याहुन अधिक कार्यकर्ते राष्ट्रवादी भवन परिसरात उभे उभे राहून बैठकीला हजर होते होते. उपस्थित उत्साही कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना आमदार संदीप क्षीरसागर यांनी आक्रमक भूमिका मांडताना म्हणाले की, कार्यकर्त्यांचा उत्साह आणि गर्दी लक्षात घेता विरोधकांना उमेदवार मिळतील की नाही अशी माझ्या मनात शंका आहे.

बीड व शिरूर तालुक्यातील सर्व त्या सर्व जिल्हा परिषद व पंचायत समिती गणात राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्ष साठी अनुकूल परिस्थिती निर्माण झाली आहे. मी माझ्या भूमिकेशी प्रामाणिक राहिलो याची ही पोहच पावती आहे. कार्यकर्त्यांनी विधानसभा निवडणुकीत माझ्या विजयासाठी अहोरात्र मेहनत घेतली. प्रसंगी जीवाची बाजी लावली. आता कार्यकर्त्यांची निवडणूक आहे. मी देखील कार्यकर्त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा



राहून साथ देणार आहे. मतदार बंधू निवडणुकीची वाट पाहत आहेत. परंतु हे सरकार निवडणुका पुढे ढकलून पळ काढण्याच्या मनस्थितीत आहे. आता कोणाची सुट्टी नाही. निश्चितपणे विरोधकांना त्यांची जागा दाखवू. सर्वांना सोबत घेऊन ही निवडणूक एकजुटीने लढू. जातीयवादाला बळी न पडता आपल्याला पुढे जायचे आहे. विरोधक मराठा- ओबीसी, हिंदू- मुस्लिम जातीयतेचे विष पेरून दिशाभूल करतील. हे सामान्य जनतेच्या लक्षात आले आहे. पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी कोणत्याही जातीय वादाला बळी न पडता एक दिलाने निवडणूक लढवायची आहे असे विचार आ. संदीप क्षरसागर यांनी मांडले. या बैठकीस मार्गदर्शन करताना जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी सरकारच्या कार्यपद्धतीचा समाचार घेताना म्हणाले की, अतिवृष्टीमुळे बीड जिल्ह्यात भयानक संकट आले होते. अतिवृष्टीने ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचे शेती व पिकाचे प्रचंड नुकसान झाले. दिवाळीपूर्वी नुकसान भरपाईची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात पडेल व सर्वांची दिवाळी गोड होईल अशी घोषणा सरकारने केली. परंतु अद्याप शेतकऱ्यांच्या खातात पैसा पडला नाही. सरकारची घोषणा वल्गना ठरली व शेतकऱ्यांच्या नशिबी काळी दिवाळी साजरी करण्याची वेळ आली. नुकसान भरपाई देताना सरकारने शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसली. बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी ५७७ कोटी ची घोषणा झाली. ही मदत अत्यंत तुटपुंजी असून पर गुंठा केवळ ३५ रुपये देऊन शेतकऱ्यांची थट्टा केली. शेतकऱ्यांच्या शेतासह त्यांच्या घरात पाणी गेले. नुकसानीचा विचार न करता निकष लावून शेतकऱ्यांना अनुदानापासून ◂◂ पान २ वर

## सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाठ यांच्याकडून जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांच्या प्रकृतीची विचारपूस

बीड । प्रतिनिधी

शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांना श्वसनाचा त्रास झाल्याने तीन दिवसांपूर्वी बीड येथील खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. याची माहिती मिळताच आज शुक्रवारी सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाठ यांनी मूळुक यांची भेट घेऊन प्रकृतीची विचारपूस केली.

शिवसेनेचा प्रत्येक झेंडा जोमाने फडकवणारे, प्रत्येक शिवसैनिकाला साथ देणारे आणि अडचणीतही हसतमुखाने उभे राहणारे शिवसेना जिल्हाप्रमुख



सचिन मुळूक यांना हृदयावर सूज व श्वसनाचा त्रास जाणवल्याने मंगळवारी (दि. २१) त्यांना बीड येथील खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. या घटनेची माहिती मिळताच शिवसेनेचे ज्येष्ठ नेते व राज्याचे सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाठ यांनी छत्रपती संभाजी नगर येथून बीडला येऊन आज गुरुवारी (दि.२४) जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांची भेट घेतली. तसेच त्यांनी डॉक्टरांकडून उपचारांची माहिती घेत मुळूक यांची प्रकृती लवकरात लवकर सुधारावी अशी ईश्वरचरणी प्रार्थना व्यक्त केली.

मंत्री शिरसाठ म्हणाले की तुमच्यासारख्या लढवू, हसतमुख आणि कार्यकर्त्यांची शिवसेनेला आजही गरज आहे. तुम्ही लवकर बरे व्हा ◂◂ पान २ वर

## गोड ऊसाचे कडू दर्शन ; तलवाडा परिसरात शॉर्टसर्किटमुळे चार एकर ऊस जळून भस्मसात

तलवाडा । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील गोदापट्यातील गंगावाडीचे शेतकरी सखाराम रामकिसन चिकणे यांची तलवाडा शिवारात शेत जमीन असून तेथील गट नंबर १२९ मधील पाच एकर ऊस लागवड मधील चार एकर ऊस तलवाडा येथील सब स्टेशन येथून मेन लाईन राहेरी कडे जाणारे मध्ये विजेचा शॉक सर्किट झाल्यामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याची दुर्दैवी घटना भावभिजेच्या पूर्वसंध्येलाच दिं. २३ ऑक्टोंबर रोजी दुपारी चार वाजेच्या सुमारास



घडली आहे. या शॉर्टसर्किट ची माहिती मिळतात आजूबाजूचे शेतकरी बांधवांनी विझवण्यासाठी मोठे प्रयत्न केले परंतु चार एकर ऊस जळून खाक झाला आहे.या प्रकरणी संबंधित विज वितरण कंपनी अधिकारी यांना संपर्क केले शेतकरी यांनी आम्ही येऊन पंचनामा करू असे वीज वितरण कर्मचारी यांच्याकडून सांगण्यात आले आहे. सखाराम रामकिशन चिकणे या शेतकरी बांधवांची उसाची नोंद छत्रपती संभाजीनगर कारखान्याची आहे. असल्याचे शेतकरी यांनी सांगितले आहे. कारखान्याने लवकरात लवकर ऊस ◂◂ पान २ वर




## रविवारी परळीत भाजप पदाधिकाऱ्यांची बैठक व दीपावली स्नेहमिलन

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी येत्या रविवारी म्हणजेच २६ ऑक्टोबर रोजी भारतीय जनता पक्षाच्या जिल्ह्यातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांसाठी दीपावली स्नेह मिलन कार्यक्रम व बैठकीचे आयोजन केले आहे.

२६ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता शहरातील हालगे गार्डन येथे हा स्नेह मिलन कार्यक्रम होणार असून या कार्यक्रमाला स्वतः पंकजाताई मुंडे उपस्थित राहून कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. या कार्यक्रमास जिल्ह्यातील भाजपाचे आमदार, माजी आमदार, सर्व प्रमुख पदाधिकारी, जिल्हा परिषद व



पंचायत समितीचे सदस्य, नगरसेवक, विविध संस्थांचे संचालक, लोकप्रतिनिधी, सरपंच, चेअरमन तसेच बूथ प्रमुख, शक्ती प्रमुख, विविध आघाड्यांचे पदाधिकारी यांना निमंत्रण देण्यात आले आहे. स्नेह मिलन कार्यक्रमाला सर्वांनी उपस्थित रहावे असे आवाहन भाजपच्या वतीने करण्यात आले आहे.

## सुरेश धस आमदार व्हावेत म्हणून केलेल्या नवसाची पूर्तता

### ग्रामस्थांकडून बैलगाडीतून भव्य मिरवणूक; उत्स्फूर्त स्वागत

आष्टी । प्रतिनिधी


आष्टी-पाटोदा-शिरूर विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार लोकनेते सुरेश धस यांचा विधानसभेत विजय व्हावा म्हणून तालुक्यातील चिंचोली येथील श्री स्वामी समर्थ गडावर एकनिष्ठ कार्यकर्ते सचिन दातीर यांनी श्री स्वामी समर्थ महाराजांना नवस केला होता. या नवसपूर्ती सोहळ्याच्या निमित्ताने गुरुवारी गावात बैलगाडीतून भव्य मिरवणूक काढण्यात आली, ज्यामध्ये ग्रामस्थ, कार्यकर्ते आणि भक्तांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. या मिरवणुकीदरम्यान आमदार सुरेश धस यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले.



या प्रसंगी बोलताना आमदार सुरेश धस म्हणाले, ''सचिनने अत्यंत श्रद्धेने हा कार्यक्रम ठेवला, त्याने केलेला नवस आज पूर्ण झाला आहे. समाजात परस्पर सहकार्याची भावना जिवंत ठेवणे ही खरी सेवा आहे. श्री स्वामी समर्थ हे 'भिऊ नको, मी तुझ्या पाठीशी आहे' असा संदेश देतात. आज आपल्या परिसरात होत असलेले हे मंदिर आणि श्रद्धेचा हा उत्सव समाजाला प्रेरणा देणारा आहे. सचिन आणि सर्व ग्रामस्थांचे मी मनःपूर्वक आभार मानतो.


माजी आमदार साहेबराव दरेकर नाना यांनी आपल्या भाषणात तरुणांना व्यसनाच्या आहारी जाऊ नये, समाजकार्यासाठी पुढे यावे, असे आवाहन केले. आपल्या परिसरात होत असलेले श्री स्वामी समर्थ हे मंदिर धार्मिक स्थळ बनले आहे.

यावेळी सचिन दातीर म्हणाले की, ''दुष्काळात सर्वात मोठी छावणी असो, उत्तराखंडचा महाप्रलय असो, कोरोना काळ असो किंवा अलीकडचा महापूर प्रत्येक संकटकाळात २४ तास धावून येणारा नेता म्हणजेच आपले आमदार सुरेश धस. लोकांनी ◂◂ पान २ वर






आष्टी : जामखेड शहरातील खर्डा चौकात पहिल्यांदाच एवढ्या मोठ्या प्रमाणावर वाहतुकीची कोंडी झाल्याचे दिसून आले.




## धारूरमध्ये बिन पाण्याची दिवाळी

किल्ले धारूर । प्रतिनिधी

धारूर शहरात मागच्या तीन आठवड्यापासून नळाला पाणी न आल्यामुळे बिन पाण्याची दिवाळी साजरी करावी लागत आहे. या अति महत्त्वाच्या बाबीकडे नगरपालिका प्रशासनाचे अजिबात लक्ष नसून फक्त पगारीसाठी सर्वजण नोकरी करताना दिसतात. नुकतेच बदली झालेले मुख्याधिकारी श्री गायकवाड हे शहरातून इतरत्र गेल्यामुळे नवीन आलेल्या अधिकाऱ्यास पाणी प्रश्न अजिबात सोडवता आलेला नाही.

धनेगाव धरणातून अनेक वर्षापासून धारूरला पाणीपुरवठा होतो. मात्र ही योजना अतिशय जीर्ण झाली असून वेळोवेळी व त्यामध्ये काहीतरी बिघाड होतो. यंत्रणेमध्ये बिघाड झाला की पंधरा-पंधरा दिवस एक एक महिना पाणी येत नाही. टँकर वाल्यांनी पैसे घेऊन का होईना जनतेची तहान भागवली असून पाणी कधी येईल याकडे सर्व जनतेचे लक्ष लागून राहिले आहे. कुंडलिका प्रकल्पाचे पाणी धारूर स्टॅन्ड पर्यंत आले असून ते लवकरात लवकर संपूर्ण शहरांमध्ये यावे यासाठी युद्ध पातळीवर प्रयत्न चे नितांत गरज आहे.







This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...
पुणे विशेष
शनिवार, दि.२५ ऑक्टोबर २०२५ । पान ७

# चिंचवडमध्ये पत्नीकडून पहाटे पतीची हत्या

**पिंपरी । प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवडमध्ये पतीच्या सततच्या चारित्र्याच्या संशयाला कंटाळून पत्नीने त्याची गळा आवळून हत्या केल्याची धक्कादायक घटना चिंचवडमध्ये घडली आहे. नकुल आनंद भोईर (वय ४०) असे हत्या झालेल्या व्यक्तीचे नाव असून, चैताली भोईर असं खून करणाऱ्या पत्नीचे नाव आहे. या घटनेमुळे चिंचवड परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, (शुक्रवारी, ता, २४) पहाटे पावणे तीनच्या सुमारास नकुल आणि चैताली यांच्यात चारित्र्याच्या संशयावरून जोरदार वाद झाला. हा वाद विकोपाला गेला. रागाच्या असलेल्या पत्नीने पती नकुलचा कापडाने गळा आवळून खून केला. या दाम्पत्याला पाच आणि दोन वर्षांची दोन लहान मुले आहेत. पतीची हत्या केल्यानंतर चिंचवड पोलिसांनी चैताली भोईर हिला तात्काळ ताब्यात घेतले आहे. या



घटनेमुळे लहान मुलांवर मोठे संकट आले आहे. चिंचवड पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत. मृत नकुल भोईरचा सामाजिक कार्यामध्ये मोठा वाटा होता, मराठा क्रांती मोर्चाच्या अनेक उपक्रमामध्ये तो जिकरीने सहभाग घ्यायचा अनेक संघटनांची देखील त्याचे संबंध राजकीय नेत्यांशी देखील त्याचे जवळचे संबंध होते, सामाजिक कार्याचा वारसापुढे चालवण्यासाठी त्याने आपल्या पत्नीला नगरसेवक बनवायचे ठरवलं होते यासाठी आगामी पिंपरी चिंचवड महापालिकेच्या निवडणुकीमध्ये तो त्याच्या पत्नीला उभे देखील करणार होता.

या घटनेबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी आणि मृत हे नात्याने पती पत्नी आहेत. मृत पतीने पत्नीच्या चारित्र्यावरती संशय घेत होता. त्यावरून दोघांमध्ये वारंवार वाद आणि भांडणं होत होती. त्याचा राग मनात धरून पत्नीने पती नकुल भोईर त्याचा खून केला आहे. गुन्हा दाखल करण्याची प्रकिया सुरू आहे. प्रकरणाचा तपास सुरू आहे. मृताचं वय ४० आहे तर आरोपीचे वय २८ आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नकुल भोईर हा पत्नी चैतालीच्या चारित्र्यावर सतत संशय घेत होता. यावरून त्यांच्यात अनेकदा वाद झाले. परंतु, शुक्रवारी पहाटे झालेल्या वादातून ही घटना घडली आहे. नकुल आणि चैताली यांच्यात वाद झाले. यातूनच प्रकृतीने भारदस्त असलेल्या चैतालीने ओढणीनं गळा दाबून हत्या केली. दोन आणि पाच वर्षांची मुलं आतील रूममध्ये झोपली होती. तेव्हा हा सर्व थरार बाहेरच्या रूममध्ये सुरू होता. नकुल आणि चैताली यांचा साडी सेंटरचा व्यवसाय होता. असं असताना नेहमीच्या वादातून आणि सतत चारित्र्यावर संशय घेतल्याने पत्नीने पतीची हत्या केली आहे. घटनेचा अधिक तपास चिंचवड पोलीस घेत आहेत.

# सासवड सांस्कृतिक मंडळाच्या किल्ले स्पर्धांना प्रतिसाद

**सासवड । प्रतिनिधी**

सासवड सांस्कृतिक मंडळाच्या वतीने पुरंदर-हवेलीमध्ये १९ वर्षांपासून सातत्याने आयोजित करण्यात येत असलेल्या किल्ले स्पर्धांना यंदाही उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे. नव्या पिढीला छत्रपती शिवरायांचा इतिहास, स्वराज्याचे कार्य आणि किल्ल्यांची ओळख व्हावी, या उद्देशाने सुरू केलेला उपक्रम आता सफल होत असल्याचे मत सांस्कृतिक मंडळाचे अध्यक्ष, माजी आमदार संजय जगताप यांनी व्यक्त केले. भारत सरकारच्या प्रयत्नाने स्वराज्यातील १२ किल्ल्यांचा युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समावेश झाल्याने किल्ल्यांचे जतन, संवर्धन होणार असल्याचेही त्यांनी नमूद केले.

सासवड (ता. पुरंदर) येथील श्री काळभैरवनाथ मंदिरासमोरील श्री काळभैरवनाथ दुर्ग सेवक आणि श्री शिव प्रतिष्ठान हिंदुस्थान सासवड यांनी तयार केलेल्या विशाळगड किल्ल्याच्या पाहणीने सासवड सांस्कृतिक मंडळाच्या किल्ले स्पर्धांच्या परीक्षणाची सुरुवात



झाली. यंदा स्पर्धेला पुरंदर-हवेलीमधून पाच हजारांहून अधिक स्पर्धकांनी सहभाग घेतल्याचे माजी आमदार संजय जगताप यांनी सांगितले. याप्रसंगी देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष रमेश जगताप, उपाध्यक्ष पांडुरंग भोंगळे, संग्राम जगताप, कैलास कावडे, रामभाऊ इनामके, संजय चव्हाण, प्रकाश जगताप, वैभव जगताप, तेजस शिवरकर यांसह ग्रामस्थ उपस्थित होते. मंडळाचे सचिव रवींद्रपंत जगताप, सदस्य संजय काटकर, प्रवीण पवार, अमित पवार, सागर घाटगे, दीपक जगताप, जीवन कड आदी किल्ल्यांचे परीक्षण करत आहेत. संजय जगताप यांनी श्री काळभैरवनाथ दुर्गसेवक मंडळाच्या स्पर्धेतील उत्कृष्ट व सातत्यपूर्ण सहभागाबद्दल विशेष कौतुक केले. "संग्राम पाटोळे, सौरभ पाटोळे व इतर सदस्य किल्ला उभारणी करताना त्या किल्ल्याला स्वतः भेट देऊन, तेथील इतिहास, रचना, दुर्ग बांधणीचे बारकावे समजून घेत त्याची प्रतिकृती उभी करतात. तसेच, वार्षिक अहवाल तयार करणारे हे दुर्ग मंडळ देशात पहिले असावे, अशा मंडळांमुळे या चळवळीला प्रेरणा मिळत असून, स्पर्धेला अधिक चांगले स्वरूप येईल," असा विश्वास जगताप यांनी यावेळी व्यक्त केला.

# उरुळीकांचन हद्दीत अत्याचारास प्रतिकार केल्याने तरुणीचा खून

**पुणे । प्रतिनिधी**

उरुळीकांचन पोलीस ठाण्याच्या हद्दीत सापडलेल्या २० वर्षीय तरुणीचा मृतदेह सापडला होता. हा खूनाचा प्रकार स्थानिक गुन्हे शाखा आणि उरुळीकांचन पोलिसांनी संयुक्तीकरीत्या उघडकीस आणत आरोपीला बेड्या ठोकल्या आहेत. तरुणीने अत्याचारास विरोध केल्याने रागाच्या भरात आरोपीने तीचा खून केल्याचे उघडकीस आले आहे. दिनेश संजय पाटोळे (वय २६, रा. गोळेवस्ती, उरुळीकांचन) असे आरोपीचे नाव आहे.

पोलिसांनी सांगितले की दि. १४ ऑक्टोबर २०२५ रोजी उरुळीकांचन-नायगाव रस्त्यावरील प्रयागधाम हॉस्पिटलजवळ एका तरुणीचा मृतदेह आढळला होता. मृतदेहाजवळ मोबाईल फोन, चप्पल आणि सँक पडलेले होते. डोक्यात गंभीर जखम झाल्याचे दिसून येत होते. तपासात हा मृतदेह पूनम विनोद ठाकूर (२०, रा. गगन आकांक्षा सोसायटी, कोरेगाव मुळ, ता. हवेली, जि. पुणे) हीचा असल्याचे उघड झाले. या प्रकरणी तरुणीचा भाऊ मनीष विनोद ठाकूर (२३) यानी दिलेल्या गुन्हा नोंदविण्यात आला होता. घटनेची गंभीरता लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल्ल यांनी तात्काळ घटनास्थळी भेट देऊन




चौकशी केली. विशेष पोलीस महानिरीक्षक सुनिल फुलारी (परिक्षेत्र कोल्हापूर) यांच्या मार्गदर्शनाखाली चार तपास पथके गठित करण्यात आली. सुमारे ६० ते ७० सीसीटीव्ही फुटेज तपासले गेले व २०० ते २५० लोकांचे जबाब घेण्यात आले.तपासात सीसीटीव्ही फुटेजमधून संशयित व्यक्ती मोटारसायकलवरून घटनास्थळी जाताना आढळली.

संशयीताची ओळख पटताच त्याच्या त्यास ताब्यात घेण्यात आले. चौकशीत त्याने गुन्ह्याची कबुली दिली. आरोपीने सांगितले की, मयत तरुणी ही पायी जात असताना त्याने तिच्याकडे अशोभनीय मागणी केली. मात्र तिने विरोध केल्याने रागाच्या भरात तिच्या डोक्यात दगड मारून खून केला. आरोपीकडून गुन्ह्यात वापरलेली स्प्लेंडर मोटारसायकल जप्त करण्यात आली आहे. न्यायालयाने त्याला २७ ऑक्टोबर पर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. ही कामगिरी अपर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार (बारामती विभाग), उपविभागीय पोलीस अधिकारी बापूराव दडस (दौंड विभाग) यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अविनाश शिळीमकर, पोलीस निरीक्षक सचिन बांगडे , सहायक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजीगरे, दत्ताजीराव मोहिते यांच्या पथकाने केली.

# पुणे जैन बोर्डिंग जमीन लाटल्याचे प्रकरण, लोकांचा प्रश्नाचा भडीमार, अधिकारी आणि ट्रस्टींना भांडावून सोडले

**पुणे । प्रतिनिधी**

शहराती मॉडेल कॉलनी येथील सेठ हिराचंद नेमचंद जैन दिगंबर बोर्डिंगच्या (झ्रींपश गरळप इेरीवळपस) जैन मंदिरासह परिसरातील जागा आणि मंदिर गहाण ठेवून तब्बल ७० कोटी रुपयांचा व्यवहार झाल्यानंतर मोठा वाद पेटला आहे. आज इथे मंदिर आहे की नाही, असेल तरी किती मोठे याची मोजणी करण्यासाठी शासकीय कर्मचारी आले होते. त्यांनी मोजणी केली. सोबत आदेशाप्रमाणे ट्रस्टी उपस्थित होते. इथे गोंधळ झाला. यावेळी लोकांनी अनेक प्रश्न विचारून ट्रस्टींना भाडांवून सोडले. याच दरम्यान एक याचिकाकर्त्यांनी ९० वर्षे जुनी एक मूर्ती दाखवली. त्यामुळं मंदिर किती




जुने आहे हेही स्पष्ट झाले.

या व्यवहारात ८ ऑक्टोबर २०२५ रोजी कर्नाटकमधील बिरेश्वर क्रेडिट सोसायटीने ५० कोटी आणि बुलढाणा अर्बन कोऑपरेटिव्ह बँकेने २० कोटी रुपये कर्ज म्हणून मंजूर केले. कोणतीही चौकशी किंवा कायदेशीर प्रक्रिया न करता हा गहाण व्यवहार केला गेला. या प्रकरणात एका विद्यार्थ्याने सोशल मीडियावर पोस्ट केल्यानंतर त्याला कर्नाटक पोलिसांकडून धमक्या मिळाल्या आहेत. पुढे अ‍ॅड. योगेश पांडे यांनी या व्यवहाराविरुद्ध कायदेशीर आक्षेप घेतला आहे. धर्मादाय आयुक्तांनी या प्रकरणाची तातडीने सुनावणी केली असून सध्या या जागेवरील स्थिती 'जैसे थे' राहणार असल्याचा आदेश दिला आहे. जैन समाजात या प्रकरणामुळे मोठा संताप व्यक्त होत असून, या जागेच्या बेकायदेशीर विक्रीविरोधात मोठे जनआंदोलन आणि मोर्चा काढण्यात आला आहे. काही विश्वस्तांनी बेकायदेशीरपणे जागा विकल्याचा आरोप होत आहे. या प्रकरणामुळे जैन समाजाचा आणि पुणेकरांचा मोठा रोष आहे. धर्मादाय आयुक्तांचा निर्णय आणि पुढील सुनावणी या प्रकरणाच्या भविष्याची दिशा ठरतील, पण सध्या या विक्रीवर तात्पुरती स्थगिती आहे. या प्रकरणात विशेष लढा चालू आहे आणि कायदेशीर लढाया सुरू आहेत.

# डॉ. अजय चंदनवाले यांची एमयुएचएसच्या कुलगुरूपदी नियुक्ती

**पुणे । प्रतिनिधी**

राज्य शासनाने वैद्यकीय शिक्षण व संशोधन विभागाचे संचालक डॉ. अजय चंदनवाले यांची नियुक्ती 'महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक (एमयुएचएस) या संस्थेच्या कुलगुरुपदी नियुक्ती केली आहे. ही नियुक्ती पुढील सहा महिन्यांसाठी असेल. याबाबतचा आदेश 'एमयुएचएस' चे कुलपती आचार्य देवव्रत यांनी जारी केल्यानंतर त्यावरून राज्यपाल कार्यालयाचे सचिव प्रशांत नारनवरे यांनी गुरुवारी (ता. २३) आदेश निर्गमित केले आहेत. डॉ. चंदनवाले यांच्याकडे 'एमयुएचएस' च्या कुलगुरू पदाबरोबर वैद्यकीय शिक्षण व संशोधन विभागाचे संचालक (डीएमईआर) या पदाचीही धुरा असणार आहे.



याआधी 'एमयुएचएस' च्या कुलगुरू लेफ्टनंट जनरल डॉ. माधुरी कानिटकर या होत्या. त्यांचा कार्यकाळ १४ ऑक्टोबर रोजी संपल्याने त्या सेवानिवृत्त झाल्या असून रिक्त पदावर डॉ. चंदनवाले यांची नियुक्ती झाली आहे. डॉ. चंदनवाले यांनी ससून रुग्णालयात अधिष्ठाता पदावर दहा वर्षे होते. त्यांच्या कार्यकाळात त्यांनी ससून रुग्णालयात विविध उपक्रम व योजना राबवत रुग्णालयामध्ये सुधारणा केली. यामध्ये प्रामुख्याने रुग्णालयातील विविध सुविधा व श्रेणीवर्धनासाठी १०० कोटींहून अधिक निधी हा विविध सामाजिक संस्था, उद्योजक यांच्या माध्यमातून 'सामाजिक उत्तरदायित्व निधी' (सीएसआर फंड) उभा केला. त्याचा थेट फायदा गोरगरीब रुग्णांना झाला. यामध्ये अद्ययावत आपत्कालीन विभाग विभाग, ५९ खाटांचा नवजात कक्ष, दगडूशेठ हलवाई मंदिराकडून रुग्णांसाठी मोफत भोजन यांचा उल्लेख करता येईल. कोरोना काळात २०२० मध्ये त्यांची नियुक्ती 'डीएमईआर' च्या सहसंचालक पदावर झाली. तर जुलै २०२३ मध्ये ते प्रभारी संचालक झाले. तर काही महिन्यांपूर्वी ते पूर्णवेळ संचालक देखील झाले. आता त्यांच्याकडे एमयुएचएस' च्या कुलगुरुपदाची जबाबदारी सोपविण्यात आली असून या पदाला न्याय देणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# शिरूर तालुक्यातील शेतकऱ्यांचे नवी दिल्लीत अर्धनग्न आंदोलन

**मांडवगण फराटा । प्रतिनिधी**

कांद्याच्या दरातील घसरण व निर्यात धोरणामुळे झालेल्या मोठ्या आर्थिक नुकसानीच्या निषेधार्थ शिरूर तालुक्यातील शेतकऱ्यांनी गुरुवारी नवी दिल्लीतील कृषी मंत्रालयासमोर अर्धनग्न अवस्थेत आंदोलन केले.

शेतकरी सागर फराटे, विजय साळुंके, परशुराम मचाले आणि नवनाथ फराटे यांनी गळयात कांद्याच्या माळा व खांद्यावर कांद्याच्या पोती घेतलेली प्रतीकात्मक वेशभूषा परिधान करून मंत्रालयाच्या प्रवेशद्वारावर सरकारने शेतकऱ्यांच्या केलेल्या 'आर्थिक नग्नतेचा' निषेध नोंदवला. कृषिमंत्री उपस्थित नसल्यामुळे शेतकऱ्यांनी कृषी मंत्रालयाचे संयुक्त सचिव अन्बलगन पी. यांची भेट घेतली. त्यांनी शेतकऱ्यांच्या समस्या गांभीर्याने ऐकून घेतल्या व संबंधित मागण्यांवर सकारात्मक पावले उचलण्याचे आश्वासन दिले.

यानंतर शेतकरी वाणिज्य मंत्रालयात निवेदन देण्यासाठी जात असताना दिल्ली पोलिसांनी त्यांना अटक करून संसद भवन कर्तव्य पथ पोलिस ठाण्यात नेले. पोलिसांनी शेतकरी सागर फराटे यांना सोबत




घेऊन प्रधानमंत्री कार्यालयात निवेदन सादर करण्याची परवानगी दिली. प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर सर्व शेतकऱ्यांना सायंकाळी मुक्त करण्यात आले. या आंदोलनाद्वारे शेतकऱ्यांनी कांदा निर्यात धोरणातील बदल, किमान हमीभाव आणि झालेल्या नुकसानीची भरपाई याबाबत तात्काळ निर्णय घेण्याची मागणी केली आहे.

# एनडीएत शिकत असलेल्या आणखी एका विद्यार्थ्याचा मृत्यू

**पुणे । प्रतिनिधी**

गुरूवारी राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीत घडलेल्या एका दुर्दैवी अपघातात तिथे पहिल्या वर्षात शिकत असलेल्या विद्यार्थ्याचा बुडून मृत्यू झाला. आदित्य यादव (१८ वर्षे) असे मृत विद्यार्थ्याचे नाव असून काही दिवसांपूर्वी एका विद्यार्थ्याने केलेल्या आत्महत्येनंतर एनडीएत विद्यार्थ्याची जीव जाण्याची दुसरी घटना आहे. गुरूवारी संध्याकाळी पोहाण्यात अकुशल असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ठेवलेल्या सरावादरम्यान हा अपघात झाल्याचे एनडीएकडून सांगण्यात आले आहे.




प्रशिक्षकांच्या देखरेखीखाली होत असलेल्या या सरावादरम्यान आदित्य आणि त्याच्या सोबतचे प्रशिक्षणार्थी पूलात पोहत असताना आदित्य पाण्यात बुडलेला आढळला. हे लक्षात येताच तिथे तैनात असलेल्या दोन लाइफगार्ड्सने पाण्यात उडी मारून त्याला बाहेर काढले. त्यानंतर तिथे त्याला सीपीआर (हृद्य - फुफ्फुस पुनरुज्जीवन) देत त्याचे प्राथमिक उपचार करण्यात आले आणि त्यानंतर त्या लष्करी रुग्णालयात हलवण्यात आले. मात्र, दुर्दैवाने त्याचा मृत्यू झाला. राष्ट्रीय संरक्षण अकादमीने या दुर्दैवी घटनेबद्दल शोक व्यक्त करत, झालेल्या घटनेबद्दल संवेदना व्यक्त केल्या आहेत. या घटनेची माहिती पोलीस तसेच विद्यार्थ्याच्या नातेवाईकांना देण्यात आली असून, अपघाताचे नेमके कारण समजण्यासाठी चौकशीचे आदेश दिले आहेत. काही दिवसांपूर्वी आदित्यच्या वर्षात शिकत असलेल्या अंतरिक्ष कुमार सिंग नावाच्या विद्यार्थ्याने रॅगिंगने त्रस्त होऊन आत्महत्या केली होती. त्यानंतर १५ दिवसात असा अपघात घडल्याने एनडीएत शिकत असलेल्या विद्यार्थ्यांच्या सुरक्षेबद्दल प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहेत. यापूर्वीही घडलेल्या अनेक अपघातात विद्यार्थ्यांना त्यांचा जीव गमवावा लागला आहे किंवा अपंगत्व आले आहे. अशा अपघातात मृत किंवा अपंग झालेल्या विद्यार्थ्यांना भारत सरकारकडून आर्थिक मदत व निवृत्तीवेतन दिले जाते. मात्र ही रक्कम अतिशय कमी असल्याने अनेकदा अपंग विद्यार्थ्यांना त्यांचे उपचार करणे देखील अशक्यप्राय ठरते, तर मृत विद्यार्थ्याच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह होत नाही.

# पाचाड येथे कष्टकरी महिलांना भाऊबीज भेट देऊन राजमाता जिजाऊंना मानवंदना

**पुणे । प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज यांनी जेथे अठरा पगड जातीच्या स्त्रियांचा सन्मान केला त्या पाचाडच्या राजमाता जिजाऊ यांच्या पवित्र समाधी स्थळी गुरुवारी मावळा जवान संघटनेच्या वतीने शेकडो महिलांना साडीचोळीची भाऊबीज भेट देऊन राजमाता जिजाऊ यांना मानवंदना देण्यात आली.

रायगड किल्ल्याच्या पायथ्याशी पाचाड येथील राजमाता जिजाऊ यांच्या समाधी व परिसरात मावळा जवान संघटनेच्या वतीने भाऊबीजेच्या दिवशी आकर्षक फुलांची सजावट, रांगोळी



काढली होती. शेकडो पणत्यांच्या दिपोत्सव परिसर उजळून निघाला होता. मावळा जवान संघटनेचे प्रदेशाध्यक्ष विजय महाराज तनपुरे व कार्यवाहक रोहित नलावडे यांच्या हस्ते पारंपरिक रिवाजात राजमाता जिजाऊ यांच्या समाधीचे पुजन करून प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. हर हर महादेव,जय जिजाऊ, जय शिवराय च्या जयघोषाने , पारंपरिक लोकगीतांनी परिसर दुमदुमून गेला होता. पाचाड, रायगडवाडी, माणगाव, महाड, पोलादपूर, सिंधुदुर्ग, रत्नागिरी आदी ठिकाणच्या तिनशेहुन अधिक कष्टकरी महिलांचा साडीचोळीची भेट देण्यात आली. अनोख्या भाऊबीज भेटीने महिला भारावून गेल्या. जेष्ठ इतिहास अभ्यासक दत्ताजी नलावडे यांनी आपल्या व्याख्यानानातुन राजमाता जिजाऊ, छत्रपती शिवाजी यांच्या मानवकल्याणकारी कार्य,महान त्याग, प्रखर राष्ट्रिय बाणा आणि विद्वत्तेचा महिमा सांगितला. मावळा जवान संघटनेचे प्रवक्ते तानाजी मरगळे यांनी जिजाऊ वंदनेने छत्रपती शिवाजी महाराज, जिजाऊंच्या त्याग, स्वातंत्र्य लढ्याचा इतिहास जागा झाला. मरगळे म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज गोरगरीब कष्टकरी महिलांचा साडीचोळी देऊन सन्मान केला. हा मावळा जवान संघटनेने भाऊबीज सोहळ्याने जिवंत केला आहे.

# बारामती एमआयडीसी परिसरात तलवार व लोखंडी कोयत्यासह एक जेरबंद !

**बारामती । प्रतिनिधी**

बारामती एमआयडीसी परिसरात दहशत माजविण्याच्या उद्देशाने बेकायदेशीरपणे तलवार आणि लोखंडी कोयता बाळगणाऱ्या व गुन्ह्याच्यावेळी या हत्यारांचा वापर करणाऱ्या आरोपीला बारामती तालुका पोलिसांनी अटक केली आहे. समर्थ सिद्ध मल्हारे (रा. मालुसरेवस्ती, वंजारवाडी, ता. बारामती) असे या आरोपीचे नाव आहे.

भा.न्या.संहिता कलम १९४(२) अंतर्गत दुसऱ्या एका गुन्ह्यातील आरोपींचा शोध घेत असताना बारामती तालुका पोलिसांना गोपनीय माहिती मिळाली की, समर्थ मल्हारे हा इसम तलवार बाळगत आहे.



त्यानंतर पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांनी तात्काळ सूत्रे हलवली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी एमआयडीसी परिसरातील श्रायबर डायनामिक्स डेअरी चे शेजारचे परिसरात छापा टाकून मल्हारे यास ताब्यात घेतले. चौकशीत त्याने तलवार घरी ठेवल्याचे सांगितल्यावर पोलिसांनी त्याच्या घराची झडती घेतली असता एक तलवार आणि लोखंडी कोयता मिळून आला. या प्रकरणी आरोपीविरुद्ध बारामती तालुका पोलिस ठाण्यात भारतीय हत्यार कायदा कलम ४,२५ अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

ही कारवाई पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल्ल, अप्पर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार, उपविभागीय अधिकारी सुदर्शन राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव, सहाय्यक पोलीस निरीक्षक विक्रम पवार, उपनिरीक्षक कल्याण शिंगाडे, अंमलदार केदारनाथ बिडवे, दादा दराडे, किशोर वीर, निलेश वाकळे, विलास खाडे, रवींद्र सोनवलकर, राहुल लांडगे यांच्या पथकाने केली.